




संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा








रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, शुक्रवार दि. २०.०२.२०२६ | अंक नं. २६८ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020













# 'नव्याने' आणि 'शास्त्रीय पद्धतीने' 'सीना'च्या पूररेषांचे सर्वेक्षण करा

नगर - शहरातून वाहणाऱ्या सीना नदीच्या पूररेषांच्या (Blue & Red Flood Lines) अनिश्चिततेमुळे शहराचा विकास आणि अनेक मिळकती बाधित झाल्या आहेत. या पार्श्वभूमीवर, राज्य शासनाने नियुक्त केलेल्या उच्चस्तरीय तज्ज्ञ समितीमार्फत या पूररेषांचे नव्याने आणि शास्त्रीय पद्धतीने सर्वेक्षण करण्यात यावे, अशी मागणी 'क्रेडाई अहिल्यानगर'ने केली आहे. यासंदर्भात क्रेडाईच्या पदाधिकाऱ्यांनी अहिल्यानगर महानगरपालिकेचे सहायक संचालक, नगर रचना यांना सविस्तर निवेदन दिले.

निवेदनात म्हटले आहे की, महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाने १० फेब्रुवारी २०२६ निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार, राज्यातील नद्यांलगतच्या पूररेषांचे नव्याने सर्वेक्षण करण्यासाठी आणि बाधित क्षेत्रातील समस्या सोडविण्यासाठी एका उच्चस्तरीय 'तज्ञ समिती'ची स्थापना करण्यात आली आहे. या शासन निर्णयाची दखल घेत अहिल्यानगर महानगरपालिकेने शहराचा प्रस्ताव तातडीने या समितीकडे पाठवावा, अशी मागणी क्रेडाईने केली आहे.

क्रेडाईचे अहिल्यानगर अध्यक्ष गिरीश अग्रवाल म्हणाले, पाटबंधारे विभागाने यापूर्वी केलेले सर्वेक्षण आणि त्यानुसार आखलेल्या पूररेषा या जमिनीच्या प्रत्यक्ष परिस्थितीशी विसंगत असल्याचे क्रेडाईचे मत आहे. हे सर्वेक्षण सदोष असल्याने अनेक मिळकती आणि सोसायट्या विनाकारण बाधित झाल्या असून, शहराचा सुनियोजित विकास रखडला आहे. त्यामुळे शहरातील बाधित मिळकतदार यांना दिलासा देण्यासाठी पूररेषांची नव्याने आखणी करणे गरजेचे आहे.

## क्रेडाईच्या प्रमुख मागण्या

१. अहिल्यानगर महानगरपालिकेने राज्य शासनाने गठीत केलेल्या अपर मुख्य सचिव (नवि-१) यांच्या अध्यक्षतेखालील समितीशी त्वरित संपर्क साधावा.

२. 'फेरसर्वेक्षण' करावयाच्या शहरांच्या यादीत अहिल्यानगर शहराचा समावेश करण्यासाठी प्राधान्याने सविस्तर प्रस्ताव सादर करावा.

३. सीना नदी व परिसराचे सर्वेक्षण शास्त्रीय पद्धतीने करून विकास कामांमधील अडथळे दूर करावेत.

हा विषय शहराच्या भविष्यातील विकासासाठी अत्यंत महत्त्वाचा असल्याने प्रशासनाने यावर तातडीने कार्यवाही करावी, अशी मागणी केल्याची माहिती क्रेडाईचे सचिव दीपक बांगर यांनी दिली.



























जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# पुणे ते नगर प्रवासात महिलेचे पावणेदोन लाखांचे दागिने लंपास

नगर - पुणे-नगर महामार्गावर प्रवासादरम्यान अज्ञात चोरट्याने एका महिलेच्या बॅगेतून सुमारे १ लाख ७२ हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत सोनाली सागर रासकर (रा. वाघोली, पुणे) यांनी नगर तालुका पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी या वाघोली येथून अकोळनेर (ता.नगर) येथे जात होत्या. १८ फेब्रुवारी रोजी सकाळी १०:३० ते सायंकाळी ५:३० वाजेच्या दरम्यान वाघोली ते केडगाव या प्रवासात ही चोरी झाली. चोरट्याने संधी साधून त्यांच्याकडील बॅगेतून ८० हजार रुपयांचा राणीहार, ६० हजार रुपयांचे मिनी गंठण, दोन अंगठ्या, कानातील वेल आणि नथ असा एकूण ७ तोळे वजनाचा ऐवज लंपास केला.

घरी पोहोचल्यानंतर दागिने चोरीला गेल्याचे लक्षात येताच रासकर यांनी नगर तालुका पोलीस ठाण्यात धाव घेतली. सहाय्यक फौजदार आर. एस. पालवे यांनी याप्रकरणी फिर्याद नोंदवून घेतली असून, भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम ३०३(२) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

स.पो.नि. गणेश वारुळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक जयेश गांगुर्डे या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.



तरुणाचा खुन करून मृतदेह वांबोरी घाटात फेकणाऱ्या मयताच्या वडिलांना व भावाला पकडल्यानंतर त्यांच्या समवेत स्थानिक गुन्हे शाखेचे पथक.

# वडिलांच्या मदतीने भावानेच तरुणाचा खून केल्याचे उघडकीस

## वांबोरी घाटातील खुन प्रकरण, स्थानिक गुन्हे शाखेने दोघांना पकडले

नगर - नगर तालुक्यातील डोंगरगण शिवारात असलेल्या वांबोरी घाटातील तरुणाच्या मृतदेहाची ओळख पटल्यानंतर आता त्याच्या खुनाचे गूढही उकलले आहे. मयत किरण शिवाजी कवाणे (वय ३२, रा. टाकळीमिया, ता. राहुरी) याचा खुन त्याचा छोटा भाऊ आणि वडिलांनीच केला असल्याचे समोर आले आहे. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने दोघांना ताब्यात घेतले असून त्यांनी खुनाची कबुलीही दिली आहे.

वडील शिवाजी शंकर कवाणे (वय ५५) आणि भाऊ योगेश शिवाजी कवाणे (वय ३०, दोन्ही रा. टाकळीमिया ता. राहुरी) अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत. वांबोरी घाटात दरी मध्ये १७ फेब्रुवारीला सकाळी ११ च्या सुमारास प्लास्टिकच्या गोणीमध्ये एकाचा मृतदेह आढळून आला होता. शवविच्छेदन अहवालात त्याचा खुन झाल्याचे स्पष्ट झाल्यावर पो.कॉ. ज्ञानेश्वर तांदळे यांच्या फिर्यादी वरून एमआयडीसी पोलिस ठाण्यात अज्ञात व्यक्ती विरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

या गुन्ह्याचा समांतर तपास पोलिस अधिक्षक सोमनाथ घार्गे यांच्या सूचनेनुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पो.नि. किरणकुमार कबाडी यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक अनंत सालगुडे, पोलीस अंमलदार विष्णु भागवत, दिपक घाटकर, गणेश धोत्रे, फुरकान शेख, आकाश काळे, बाळासाहेब गुंजाळ, अमृत आढाव, प्रशांत राठोड, चालक महादेव भांड यांचे पथक करत होते.

या पथकाने जिल्ह्यामध्ये मागील काही दिवसामध्ये मयताचे वर्णनाचा कोणी इसम मिसिंग आहे काय याबाबत माहिती घेतली. पथकास टाकळीमिया (ता. राहुरी) येथील किरण शिवाजी कवाणे हा मिसिंग असुन त्याचे नातेवाईकांनी मिसिंग तक्रार दाखल केलेली नसल्याची माहिती प्राप्त झाली. सदर माहितीचे आधारे पथकाने १९ फेब्रुवारी रोजी टाकळीमिया याठिकाणी जावुन माहिती घेवुन मयत किरण चे वडील शिवाजी शंकर कवाणे आणि भाऊ योगेश शिवाजी कवाणे यांना ताब्यात घेतले. त्यांच्या कडे सखोल व बारकाईने विचारपुस करता योगेश कवाणे याने त्याचा मयत भाऊ किरण कवाणे हा नेहमी दारु पिवुन आईवडीलांना मारहाण करत असल्याचे कारणावरुन वडीलांचे मदतीने खुन केल्याची कबुली दिली आहे. तसेच खुन केल्यानंतर प्रेताची विल्हेवाट लावण्यासाठी ते स्विफ्ट कार (क्र. एम. एच. ४६ एक्स ७४६०) मध्ये टाकून वांबोरी घाटात आणून दरीत फेकून दिल्याची कबुली दिली. पथकाने गुन्ह्यात वापरलेली कार तपासकामी जप्त केली आहे. आरोपींना पुढील तपासासाठी एमआयडीसी पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

# शेतातील बांधावरुन २ गटात तुफान हाणामारी; लोखंडी रॉड, लाकडी दांडके, दगडांनी मारहाण

नगर - नगर तालुक्यातील शिंगवे नाईक परिसरात शेताच्या सामाईक बांधावरून २ गटात तुफान हाणामारी झाली, लोखंडी रॉड, लाकडी दांडके आणि दगडांचा वापर करत जीवघेणा हल्ला करण्यात आला. या प्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात एका गटाच्या चौघांविरुद्ध खुनाच्या प्रयत्नाचा तर दुसऱ्या गटाच्या चौघांवर मारहाणीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शिंगवे नाईक येथील इस्लामपूर शिवारातील शेत गट नंबर १६९ च्या सामाईक बांधावर ही घटना घडली. फिर्यादी चंद्रकांत उर्फ बाबा दत्तात्रय काळे हे आपल्या शेतात असताना आरोपींनी जुन्या वादातून त्यांना व त्यांच्या नातेवाईकांना गाठले. यावेळी झालेल्या वादात आरोपी गोरख भाऊसाहेब जाधव याने लोखंडी पाईपने ऋषिकेश काळे यांच्या डोक्यात प्रहार करून त्यांना जिवे मारण्याचा प्रयत्न केला.

याच वेळी गौरव गोरक्षनाथ जाधव याने फिर्यादीच्या वडिलांना खाली पाडले, तर बाळासाहेब भाऊसाहेब जाधव याने लोखंडी रॉडने त्यांच्या डोक्यावर आणि पायावर गंभीर मारहाण केली. आरोपी धनंजय सुभाष जाधव यानेही लाकडी दांडक्याने ऋषिकेश काळे यांना बेदम मारहाण केली. सर्व आरोपींनी फिर्यादी आणि त्यांच्या कुटुंबाला लाथाबुक्क्यांनी मारहाण करत जिवे मारण्याची धमकी दिली. याबाबत चंद्रकांत काळे यांच्या फिर्यादी वरून गोरख भाऊसाहेब जाधव, बाळासाहेब भाऊसाहेब जाधव, गौरव गोरक्षनाथ जाधव, धनंजय सुभाष जाधव (सर्व रा.शिंगवेनाईक, ता.नगर)या चौघांच्या विरुद्ध खुनाच्या प्रयत्नाचा गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी लोखंडी पाईप, रॉड आणि लाकडी दांडके जप्त केले आहेत. उपविभागीय पोलीस अधिकारी शिरीष वमने, स.पो.नि. माणिक चौधरी यांनी घटनास्थळी भेट दिली असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक विनोद परदेशी करत आहेत.

दुसऱ्या गटाचे गोरख भाऊसाहेब जाधव यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हंटले आहे की, फिर्यादी आणि त्यांचा भाऊ बाळासाहेब जाधव यांनी आरोपींना गट नंबर १७०/१ च्या सामाईक बांधावर दगड टाकू नका, असे सांगितले. याचा राग आल्याने दत्तात्रय मुरलीधर काळे, चंद्रकांत उर्फ बाबा दत्तात्रय काळे, भरत शिवाजी काळे आणि ऋषी अंकुश काळे (सर्व रा. शिंगवे नाईक) यांनी शिवीगाळ करण्यास सुरुवात केली.

रागाच्या भरात आरोपींनी लाकडी दांडके आणि दगडांनी गोरख जाधव यांना बेदम मारहाण केली. तसेच त्यांचे चुलत भाऊ धनंजय जाधव आणि मुलगा सचिन जाधव यांनाही शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी दिली. या फिर्यादी वरून पोलिसांनी दत्तात्रय मुरलीधर काळे, चंद्रकांत उर्फ बाबा दत्तात्रय काळे, भरत शिवाजी काळे आणि ऋषी अंकुश काळे या चौघांच्या विरुद्ध मारहाणीचा गुन्हा नोंदवला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार मिसाळ करत आहेत.

# कु. हर्षा अत्रे हिचे कथ्थक परिक्षेत यश



नगर - मुंबई येथील अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय यांच्या तर्फे घेण्यात आलेल्या 'कथ्थक'च्या 'मध्यमा प्रथम' (चौथी परीक्षा) या परीक्षेत कु. हर्षा राहुल अत्रे ही प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाली. या परीक्षेसाठी तिला नृत्यझंकारच्या संचालिका प्रिया ओगले यांचे मार्गदर्शन लाभले.

# '१९ व्या प्रतिबिंब चित्रपट महोत्सवात नॅशनल स्पर्धेत' नगरच्या उदय जोशी यांच्या छायाचित्रास ज्युरी अ‍ॅवॉर्ड

नगर - अ. जि. म. वि. प्रसारक समाजाच्या न्यू आर्टस् कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स कॉलेजच्या संज्ञापन अभ्यास विभागातर्फे आयोजित १९ वा प्रतिबिंब चित्रपट महोत्सव नुकताच झाला. या निमित्ताने राष्ट्रीय प्रतिबिंब छायाचित्र स्पर्धा आयोजित केली होती. स्पर्धेचे हे चौथे वर्ष आहे. नैसर्गिक आपत्ती हा यावर्षीची फोटोग्राफीचा विषय होता. या स्पर्धेकरीता ५३२ छायाचित्रकारांनी प्रवेशिका पाठविल्या होत्या. यापैकी २९७ स्पर्धकातून उदय जोशी यांची ज्युरी अ‍ॅवॉर्ड मिळाला आहे. दिग्दर्शक संकेत पावसे, व्हाईस प्रिन्सिपल डॉ. बाळासाहेब सागडे, अ.जि.म.वि.प्र. समाजाचे अध्यक्ष रामचंद्र दरे, प्रा. संदिप गिऱ्हे यांच्या प्रमुख उपस्थितीत न्यू आटर्सच्या राजर्षी शाहू महाराज सभागृहात हा समारंभ झाला.




प्रतिबिंब चित्रपट महोत्सव राष्ट्रीय प्रतिबिंब छायाचित्र स्पर्धेत उदय जोशी यांची ज्युरी अ‍ॅवॉर्ड अ.जि.म.वि.प्र.समाजाचे अध्यक्ष रामचंद्र दरे यांच्या हस्ते देण्यात आले. (छाया - उदयन घोडके)

नैसर्गिक आपत्ती या विषयाला अनुसरून आगडगाव परीसरातील छायाचित्राला पारितोषिक मिळाले असून सदर पाण्याकरीता आलेल्या टॅकमधील पाणी भरतानाचे ते छायाचित्र आहे. महिला पुरूषांनी गदी केली आहे पाणी परत कधी मिळणार यामुळे पाणी साठवून ठेवण्यासाठी आपल्या घरातील सर्व साहित्य ज्यात पाणी साठवता येईल ते आणले होते. त्यावेळी टैकर कमी येत असल्याने पाण्यासाठी गदी होत होती याकरीता सर्वजण लहान मुले, महिला वृध्द नागरिकही मदत करत होते.

# अल्पवयीन मुलीचे अपहरण करुन ५ दिवस केले अत्याचार

## पोलिसांनी ३ आरोपींना अटक करत पिडीत मुलीची केली सुटका

नगर - राहुरी तालुक्यातील एका गावातील अल्पवयीन मुलीच्या अपहरण व अत्याचाराची गंभीर घटना उघडकीस आली आहे. 'कॉलेजला जाते' असे सांगून घरातून बाहेर पडलेल्या १५ वर्षीय मुलीचे अपहरण करून तिला पाच दिवस घनदाट जंगलात डांबून ठेवण्यात आले आणि तिच्यावर लैंगिक अत्याचार करण्यात आला. या प्रकरणी पोलिसांनी मुख्य आरोपीसह तिघांना अटक केली असून तपास वेगाने सुरू आहे. या प्रकरणाला आता 'लव्ह जिहाद'चा अँगल जोडला जात असून राजकीय वातावरणही तापले आहे. गावकऱ्यांनी गाव बंद ठेवून निषेध नोंदवला आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित मुलगी १३ फेब्रुवारी रोजी सकाळी घरातून बाहेर पडली होती. सायंकाळपर्यंत ती परत न आल्याने कुटुंबीयांनी परिसरात शोधाशोध केली. मात्र काहीच ठोस माहिती न मिळाल्याने त्यांनी तत्काळ राहुरी पोलीस ठाणे येथे धाव घेत तक्रार दाखल केली. अल्पवयीन मुलगी बेपत्ता झाल्याने पोलिसांनी अपहरणाचा गुन्हा नोंदवून विशेष पथक नेमले.

वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली मोबाईल लोकेशन ट्रॅकिंग, सीसीटीव्ही फुटेज आणि गोपनीय माहितीच्या आधारे तपास करण्यात आला. तपासादरम्यान मुलीला नाशिक-सुरत मार्गालगत असलेल्या रामशेज किल्ला परिसरातील जंगलात नेण्यात आल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी तत्काळ त्या भागात शोधमोहीम राबवून मुलीची सुटका केली.



अल्पवयीन मुलीचे अपहरण करून अत्याचार करणाऱ्या आरोपींना पकडल्यानंतर त्यांच्या समवेत राहुरी पोलिसांचे पथक.


सुटकेनंतर पीडितेच्या जबाबानुसार तिला पाच दिवस जंगलात डांबून ठेवण्यात आले होते. या काळात तिच्यावर लैंगिक अत्याचार करण्यात येत होते. या प्रकरणी मुक्तार हैदर पठाण (मुख्य आरोपी), कौसर हैदर पठाण आणि आकाश शरद संसारे यांना अटक करण्यात आली आहे. आरोपींविरुद्ध पोक्सो तसेच भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, श्रीरामपूरचे अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे, उपविभागीय पोलीस अधिकारी जयदत्त भवर यांच्या मार्गदर्शनाखाली राहुरी पोलीस ठण्याचे पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या नेतृत्वात पोलीस अंमलदार गणेश वाघमारे, इफ्तेखार सय्यद, चांद भाई पठाण, प्रमोद ढाकणे, सतीश कुराडे, नदीम शेख यांनी केली. गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस गणेश वाघमारे आणि इफ्तेखार सय्यद करत आहेत.

# औषध कंपनीचा दरवाजा तोडून साहित्याची चोरी; गुन्हा दाखल

नगर - शहरातील पुणे स्टँडच्या पाठीमागील परिसरात असलेल्या एका औषध निर्मिती कंपनीचे दरवाजे तोडून अज्ञात चोरट्याने ३१ हजार रुपये किमतीचे कॉपरचे साहित्य चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस चोरट्याचा शोध घेत आहेत.

याबाबत अविनाश बाबासाहेब कोतकर (वय ५४, शोभा कॉलनी, सावेडी) हे आफाली फार्मास्युटिकल कंपनीत कामाला आहेत. अज्ञात चोरट्याने १६ ते १९ फेब्रुवारी दरम्यान संधी साधून कंपनीचे लाकडी आणि लोखंडी दरवाजे तोडून आत प्रवेश केला. चोरट्याने कंपनीतील २५ हजार रुपये किमतीची ३५ मीटर काळ्या रंगाची तांब्याची वायर आणि ६ हजार रुपये किमतीचे 'सिलेक्ट कोटिंग मशीन'चे ६ किलो वजनाचे तांब्याचे पॅन, असा एकूण ३१ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला. याप्रकरणी अविनाश कोतकर यांनी दिलेल्या फिर्यादीवरून कोतवाली पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ३३१ (४) आणि ३०५ (अ) नुसार गुन्हा नोंदवला आहे. घटनेची माहिती मिळताच पोलीस उपनिरीक्षक शीतल मुगडे यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. पोलीस हवालदार सूर्यकांत डाके या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

## डॉ. रमेशलाल कटारिया यांचे अल्प आजाराने निधन




नगर - खिस्तगल्ली येथील रहिवासी डॉ. रमेशलाल बाबुलाल कटारिया (वय ७४) यांचे २० फेब्रुवारी रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पत्नी, २ मुली, जावई, पुतणे असा परिवार आहे. पुष्पलता यांचे ते पती तर राहुल, अतुल यांचे काका तसेच तृप्ती अमोल गांधी, नेहा आशीष भळगट यांचे वडील होत.

## प्रियाताई मुळे यांचे अल्प आजाराने निधन



नगर - कल्याण रोड येथील रहिवासी सौ. प्रियाताई मुळे (वय ३७) यांचे १८ फेब्रुवारी रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नारायणगाव जुन्नर मांजरवाडी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पती, १ मुलगी, आई, बहीण, दीर, सासू सासरे असा परिवार आहे. शाम मुळे यांच्या त्या पत्नी होत.

हनुमान चालिसा पाठ

शनिवार दि. २१/०२/२०२६
रात्री ८.३० ते १०.३०

श्री दक्षिणमुखी हनुमान सत्संग मंडळ, सर्जेपुरा, अहिल्यानगर

दक्षिणमुखी हनुमान मंदिर, सर्व सेवेकरी वृंद व परदेशी परिवार, सर्जेपुरा ७०२०८८७४१४

मंगल भक्त सेवा मंडळ, मंगल दत्तक्षेत्र, एम.आय.डी.सी.

श्री काष्ठ गणेश देवस्थान, सिताराम सारडा विद्यालय, बागडपट्टी, श्री. राजेंद्र विद्ये, ९८६०२२२२५९




अहिल्यानगर येथे १० वी परिक्षेसाठी परीक्षा केंद्रावर विद्यार्थ्यांचे हॉल तिकीट तपासून त्यांना प्रवेश देताना अधिकारी.

# डी.जे.चा दणदणाट केल्याने गुन्हा दाखल

नगर - शहरातील न्यू आर्ट्स कॉलेजच्या मुख्य प्रवेशद्वारासमोर नियमांचे उल्लंघन करून मोठ्या आवाजात डी.जे. वाजवणाऱ्या मंडळाचे अध्यक्ष आणि डी.जे.चालकावर तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन केल्याप्रकरणी ही कारवाई करण्यात आली आहे.

याप्रकरणी पो.कॉ. सचिन डाके यांनी फिर्याद दिली आहे. पोलिसांनी गजानन अरविंद भांडवलकर (रा. सिव्हिल हडको), प्रणव संतोष कदम (रा. साईनगर, बोल्हेगाव) आणि डी.जे. चालक रोहित किसन राठोड (रा. आष्टी, जि. बीड) यांच्यावर गुन्हा नोंदवला आहे. १९ फेब्रुवारी रोजी सकाळी ५ ते दुपारी १२:३० च्या सुमारास ही घटना घडली.

आरोपींनी कॉलेज परिसरात कर्णकर्कश आवाजात गाणी लावून ध्वनी प्रदूषण केले. बंदोबस्तावर असलेल्या पोलीस अधिकारी व अंमलदारांनी त्यांना वारंवार आवाज कमी करण्याच्या सूचना दिल्या होत्या. मात्र, त्याकडे दुर्लक्ष करून आरोपींनी आवेशपूर्ण घोषणाबाजी केली आणि डी.जे.चा आवाज वाढवला. अखेर पर्यावरण संरक्षण आणि ध्वनी प्रदूषण अधिनियमातील कलमान्वये त्यांच्यावर तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पुढील तपास महिला पोलीस हवालदार प्रमिला गायकवाड करत आहेत.

# शब्दांतून 'यंत्र' उलगडणारा किमयागार अशोक पांडुरंग दळवी

मराठी भाषेत तांत्रिक विषयांवर पुस्तके लिहिणे हे एक मोठे आव्हान असते, पण श्री. शेखर दळवी ऊर्फ श्री. अशोक पांडुरंग दळवी (वय ७१) यांनी हे आव्हान केवळ पेललेच नाही, तर ते यशस्वी करून दाखवले. अहिल्यानगर (अहमदनगर) येथे १३ फेब्रुवारी २०२६ रोजी त्यांचे नुकतेच दुःखद निधन झाले. त्यांच्या 'मोटार यांत्रिकी' या प्रसिद्ध पुस्तकाने महाराष्ट्रातील हजारो मराठी तरुणांच्या हाताला काम दिले आणि त्यांचे आयुष्य उभे केले.

**त्यांच्या कार्याची प्रमुख वैशिष्ट्ये :** ज्ञानाचे लोकशाहीकरण: इंजिनिअरिंगचे ज्ञान प्रामुख्याने इंग्रजीत उपलब्ध असताना, श्री. दळवी सरांनी ते अत्यंत साध्या मराठी भाषेत मांडले. यामुळे ग्रामीण भागातील तळागाळातील तरुणांसाठी रोजगाराची आणि सन्मानाची दारे उघडली गेली.

अतिशय सोपी मांडणी : इंजिनचा पिस्टन असो वा गाड्यांमधील क्लिष्ट वायरिंग; सरांच्या पुस्तकातील आकृत्या आणि स्पष्टीकरण इतके अचूक व सुटसुटीत असे की, कमी शिकलेला माणूसही ते वाचून एक उत्तम मेकॅनिक बनू शकला. श्री. दळवी यांनी हे पुस्तक लिहिताना आकृत्यांचा (Diagrams) भरपूर वापर केला आहे. तांत्रिक शब्द क्लिष्ट न ठेवता ते सर्वसामान्यांना समजतील अशा भाषेत मांडले आहेत, हे या पुस्तकाचे सर्वात मोठे यश आहे.



अनुभव आणि शैली : त्यांनी या क्षेत्रातील तांत्रिक गुंतागुंत अत्यंत सोप्या भाषेत मांडण्याचे काम केले आहे. त्यांची लिहिण्याची शैली ही 'शिक्षा' (Instructor) सारखी आहे; म्हणजे एखादी गोष्ट प्रत्यक्ष समोर बसून शिकवावी, तसे त्यांचे लेखन वाटते. त्यांच्या मार्गदर्शनामुळे अनेकांना स्वतःचे गॅरेज आणि स्वतःचा व्यवसाय सुरू करण्याची प्रेरणा मिळाली.

**व्यापक व्याप्ती आणि आधुनिकता :** हे पुस्तक केवळ जुन्या गाड्यांवर आधारित नसून, त्यात आधुनिक इंजिन तंत्रज्ञान (उदा. MPFI, CRDI सिस्टीम) बद्दलही माहिती मिळते. पुस्तकात प्रत्येक सुट्या भागाची (Parts) सुबक आकृती दिली आहे. यामुळे इंजिन न उघडताही त्याच्या आतील रचना कशी असेल, याचा अंदाज वाचकाला येतो.

**व्यावहारिक ज्ञान :** गाडी चालू होत नसेल तर काय करावे? इंजिन ओव्हरहीट का होते? अशा दोष निवारण (Troubleshooting) संदर्भातील व्यावहारिक प्रश्नांची उत्तरे यात विभागवार दिली आहेत. तांत्रिक शब्द (उदा. Piston, Crankshaft) तसेच ठेवून त्याचे कार्य मराठीत समजावून सांगितल्यामुळे समजायला सोपे जाते.

**मोठे योगदान :** महाराष्ट्रातील ग्रामीण आणि निमशहरी भागातील मुलांपर्यंत, ज्यांना इंग्रजीतील तांत्रिक पुस्तके वाचायला कठीण जातात, त्यांच्यापर्यंत ऑटोमोबाईल इंजिनिअरिंग पोहोचवण्यात त्यांचा मोठा वाटा आहे.

आज जरी श्री. अशोक पांडुरंग दळवी सर आपल्यात नसले, तरी राज्यातील प्रत्येक गॅरेजमध्ये आणि प्रत्येक ऑटोमोबाईल विद्यार्थ्याच्या बॅगेत असलेल्या त्यांच्या 'शेखर दळवी' लिखित पुस्तकाच्या रूपाने ते सदैव जिवंत राहतील. एका खऱ्या अर्थाने 'तंत्र-महर्षी' ला महाराष्ट्र आज मुकला आहे. त्यांच्या निधनामुळे ऑटोमोबाईल क्षेत्रातील एका मार्गदर्शक युगाचा अंत झाला असून, त्यांच्या स्मृतीस ही भावपूर्ण श्रद्धांजली!

**- मोटार यांत्रिकी पुस्तकाचे लेखक शेखर दळवी**

# गृहिणी

## आरोग्य

### भेंडी खाण्याचे लाभ...

लेडी फिंगर म्हणून ओळख असणारी हिरवी भाजी भेंडी, भाज्यांमध्ये बऱ्याच लोकांना पसंत येते, तर त्याला नापसंत करणारे लोक देखील असतात. पण भेंडीच्या या फायद्यांना जाणून घेतल्यावर तुम्ही नक्कीच याचे सेवन कराल. भेंडीला आपल्या ताटात सामील करून तुम्ही कॅन्सरला पळवू शकता. खास करून कोलन कॅन्सरला दूर करण्यासाठी भेंडी फारच फायदेशीर असते. ही आतड्यांमध्ये उपस्थित विषारी तत्त्वांना बाहेर काढण्यास मदत करते, ज्याने तुमच्या आतड्या स्वस्थ राहतात आणि उत्तम प्रकारे काम करतात. भेंडी तुमच्या हृदयाला देखील स्वस्थ ठेवते. यात उपस्थित पॅक्टिन कोलेस्टरॉलला कमी करण्यास मदत करतो. तसेच यात असणारे विरघळणारे फायबर, रक्तात कोलेस्टरॉलला नियंत्रित करतो, ज्याने हृदय रोगाचा धोका कमी राहतो.

## पाककला

### उपवास कचोरी

**साहित्य** : ४ मोठे उकडलेले बटाटे, अर्धी वाटी राजगिरा पीठ किंवा आरारोट पावडर (बाइंडिंगसाठी), ओलं खोबरं, दाण्याचा कूट, साखर, लिंबू रस, मिरच्या

**कृती** : सर्वात आधी उकडलेले बटाटे मॅश करून त्यात थोडे मीठ आणि पीठ मिसळून गोळा तयार करा. सारणासाठी खोबरं, कूट, मिरची, साखर आणि लिंबू रस, मिरची पेस्ट एकत्र करा.

बटाट्याच्या गोळ्याची पारी करून त्यात सारण भरा आणि गोल गोळे तयार करून गरम तेलात तळून घ्या. खोबरं आणि दाण्याच्या मिश्रणाने भरलेली ही कचोरी खूप छान लागते.

## वास्तू

### मोबाईल वॉलपेपर

मोबाईल फोन कोणत्याही प्रकारे धरतो, घाणेरड्या हातांनी किंवा खोट्या हातांनी किंवा काही लोक मोबाईल फोन टॉयलेट किंवा बाथरूममध्ये घेऊन जातात. अशात, धार्मिक स्थळांचे फोटो लावणे योग्य ठरणार नाही कारण ते त्यावर असलेल्या देवतांचा अपमान ठरेल. लोक त्यांच्या मोबाईलवर देवाचा फोटो वॉलपेपर म्हणून लावतात, जे पूर्णपणे चुकीचे आहे. वास्तुशास्त्रानुसार, देव-देवतांच्या चित्रांसह वॉलपेपर लावल्याने ग्रहदोष निर्माण होतात.

## सौंदर्य

कोणाला पातळ आयलायनर आवडते, तर कोणाला जाड आयलायनर आवडते. पातळ आयलायनरमुळे ते डोळ्यांवर जास्त काळ टिकत नाही. अशा परिस्थितीत, तुम्ही नेहमी थरांमध्ये आयलाइनर लावावे. यामुळे आयलायनर डोळ्यांवर जास्त काळ टिकेल.

## सल्ला

चहाची पत्ती फक्त बागकामासाठी वापरली जात नाहीत. याच्या मदतीने डब्याबरोबरच अनेक प्रकारची भांडीही स्वच्छ करता येतात. काचेच्या वस्तूंवरील डाग काढून टाकण्यासाठी चहापत्तीचा वापर केला जाऊ शकतो.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

शनिवार, दि. २१ फेब्रुवारी २०२६

**विनायक चतुर्थी, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, फाल्गुन शुक्लपक्ष, रेवती १९।०७, सूर्योदय ०६ वा. ३८ मि. सूर्यास्त ०५ वा. ३३ मि.**

## राशिभविष्य

**मेष** : कोणाकडून पूर्वी कर्ज घेतले असेल तर आज तुम्ही ते फेडण्यात यशस्वी व्हाल. आज तुम्ही तुमच्या मित्रासोबत पार्टी कराल.

**वृषभ** : आरोग्याबाबत जागरूक राहावे लागेल. गोड बोलून समोरच्यांकडून आपले काम काढून घेण्याची कला आज आत्मसात करावी लागेल.

**मिथुन** : आज कोणतीही मालमत्ता खरेदी किंवा विक्री करण्याचा विचार करत असाल तर वडिलांचा सल्ला घेऊन त्यातील कायदेशीर बाबींचा अभ्यास करावा लागेल

**कर्क** : आज जर तुम्हाला घरामध्ये किंवा व्यवसायात कोणाच्या बोलण्याचे वाईट वाटले तर गोष्टी तुमच्या मनात ठेवा त्यांना काही बोलायला जाऊ नका.

**सिंह** : नोकरीच्या शोधात असणाऱ्या लोकांना आज चांगली संधी मिळू शकते ज्यामुळे त्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यास मदत होईल.

**कन्या** : भविष्यात तुमची फसवणूक होऊ शकते. आज तुम्हाला तुमच्या सासरच्या लोकांकडून आदर मिळेल.

**तूळ** : मनासारखी नोकरी मिळाल्याने तुम्हाला आनंद होईल. आज संध्याकाळी तुम्ही तुमच्या कुटुंबातील सदस्यांसोबत धार्मिक स्थळी जाल.

**वृश्चिक** : काही प्रभावशाली लोकांकडून एखादी महत्वाची माहिती देखील मिळू शकेल. तुम्ही उधार दिलेले पैसे आज परत मिळतील. ज्यामुळे तुम्हाला आनंद होईल.

**धनु** : आजचा दिवस तुमच्या साहस आणि शौर्यामध्ये वाढ करणारा असेल. नोकरदार लोकांना आज सहकाऱ्यांसोबत फिरायला जाण्याची संधी मिळू शकते.

**मकर** : आज तुम्ही तुमच्या प्रगतीने तुमच्या कुटुंबातील सदस्यांना आश्चर्यचकित करू शकता. मुलाच्या अचानक आजारपणामुळे तुम्हाला धावपळ करावी लागू शकते

**कुंभ** : आजचा दिवस तुमच्यासाठी आनंदी असेल. नवीन वाहन खरेदी करण्यासाठी आज कुटुंबातील सदस्यांचा सल्ला घेऊ शकता. मातृचिंता सतावेल.

**मीन** : परस्पर प्रेम वाढेल. व्यवसायातही तुमचे कोणी शत्रू असतील तर आज ते तुमच्यापुढे नतमस्तक होतील.

## शब्दगंध क्र. ७३७१ सौ.शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ■ | ४ | ५ | ६ |
| ७ | | ■ | ८ | | | | |
| | ■ | ९ | | ■ | | ■ | |
| ■ | १० | | ■ | ११ | | १२ | |
| १३ | | | १४ | | ■ | | ■ |
| १५ | | ■ | | ■ | १६ | | १७ |
| | ■ | १८ | | | | ■ | |
| १९ | | | | ■ | २० | | |

**आडवे शब्द :-** १) एक उच्च प्रकारचा तांदूळ ४) दोन किंवा अधिक शब्दांचा मिळून बनलेला एक शब्द ७) सचोटीविषयीचा दुसऱ्याचा विश्वास; प्रतिष्ठा; वजन ८) तप्त; तापलेले; रसरशीत ९) प्रेम; ममता; लाक्षणिक अर्थाने संपत्ती १०) नुकताच; आताच; पावसाचे एक नक्षत्र ११) मुस्लीम पुरुषाचे एक नाव १३) ज्याला म्हातारपण व मृत्यू नाही असा १५) चालण्याची ढब; वर्तणूक; वर्तन १६) ढग; घन; आभाळ १८) चांगले वर्तन; चांगली वागणूक १९) सत्त्वयुक्त; सकस २०) सरळ नसलेला; वक्र

**उभे शब्द :-** १) एक फूल २) पडणे; नाश; पतन ३) अगदी सहज; हसतखेळत ४) स्त्रियांचे एक वस्त्र ५) एक कीटक; मक्षिका ६) पंजाबमधील एक नदी मागे पाऊल ९) परत; वापस; १०) एका दिवसात आक्रमिलेला रस्ता; टप्पा ११) पंख; दुसरा १२) भुतांचा राजा १३) एकाएकी; अकस्मात १४) मतदान करणारे लोक १६) एक सुगंधी वनस्पती १७) जाड दळण; जाड दळलेली डाळ वगैरे १८) नेहमी; हमेशा

### शब्दगंध क्र. ७३७० चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| शे | व | गा | व | ■ | ब | ना | व |
| गा | ज | र | ■ | क | ला | व | ती |
| व | न | ■ | झे | ल | म | ■ | ने |
| ■ | दा | ख | ला | ■ | त | मा | ■ |
| चौ | र | स | ■ | भा | ■ | घ | सा |
| की | ■ | ■ | शू | ल | ■ | ■ | व |
| दा | वे | दा | र | ■ | ना | स | का |
| र | द | न | ■ | सो | म | वा | र |

### फिल्मीचक्कर क्र. १२२५ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| मै | ने | प्या | र | कि | या | ■ | झ |
| क्या | ■ | ■ | बी | ■ | रा | ■ | न |
| क | ■ | रो | ■ | बि | ना | य | क |
| रू | प | ते | रा | ■ | ■ | ■ | झ |
| रा | ■ | हु | ■ | खा | न | दा | न |
| म | ■ | ये | ■ | ■ | ■ | ■ | क |
| मु | ■ | आ | स | पा | स | ■ | ■ |
| झे | ■ | ते | ■ | स | न | म | ■ |

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

**सुविचार** : कोणत्याही माणसाला अडचणीत जपा तो तुम्हाला आयुष्यभर जपेल.

# मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

## 'मेयोनेज' कशापासून बनवले जाते?

मोमोजसोबत मेयोनेज खाणे सर्वांना आवडते, तर अंडी-आधारित मेयोनेझ आणि अंडी शिवाय शाकाहारी मेयोनेज कसे बनवले जातात आणि ते आरोग्यासाठी कोणते धोके निर्माण करू शकतात ते जाणून घ्या.

मोमोजच्या लाल चटणीसोबत मेयोनेज खाणे सर्वांना आवडते. मेयोनेझ बहुतेकदा बर्गर आणि सँडविचमध्ये जोडले जाते आणि आई अनेकदा त्यांच्या मुलांना पराठ्यांमध्ये मेयोनेज मिसळून खायला घालतात. पण हे मेयोनेझ कसे बनवले जाते आणि ते आरोग्यदायी आहे का? अंडी-आधारित आणि अंड्याशिवाय मेयोनेझ कसे बनवायचे ते जाणून घेऊया.

मूळ मेयोनेजमध्ये वनस्पती तेल, अंड्याचा पिवळा भाग, व्हिनेगर किंवा लिंबाचा रस, मीठ, मिरपूड आणि कधीकधी चवीनुसार मोहरी पावडर असते. मिक्सर किंवा ब्लेंडरमध्ये हे घटक एकत्र करून मेयोनेझ तयार केले जाते. तसेच अंडी-विरहीरित मेयोनेझ थंड दूध किंवा क्रीमपासून बनवले जाते. पीठ, मोहरी किंवा व्यावसायिक स्टॅबिलायझर, रिफाइंड तेल किंवा पाम तेलासह जोडले जातात.

दुकानदार बहुतेकदा दोन्ही प्रकारचे मेयोनेज देतात. लहान दुकानांमध्ये किंवा मोमोज विकणाऱ्यांमध्ये अंडी-आधारित मेयोनेज अधिक सामान्य आहे.

मेयोनेज खाण्याचे संभाव्य दुष्परिणाम काय आहे?

वजन वाढणे - मेयोनेझमध्ये तेलाचे प्रमाण जास्त असते, ज्यामुळे जलद वजन वाढू शकते.

सोडियमचे प्रमाण - मेयोनेझमध्ये अनेकदा मीठ जास्त असते, ज्यामुळे उच्च रक्तदाब आणि हृदयरोग होऊ शकतात.

प्रिझर्व्हेटिव्ह्ज आणि स्टेबिलायझर्स - बाजारातून खरेदी केलेल्या मेयोनेझमध्ये अनेकदा प्रिझर्व्हेटिव्ह्ज आणि स्टेबिलायझर्स असतात. या रसायनांचे दीर्घकाळ सेवन केल्याने आरोग्यावर नकारात्मक परिणाम होऊ शकतात.

साल्मोनेलाचा धोका - कच्च्या अंड्यांसह बनवलेले मेयोनेझ खाल्ल्याने साल्मोनेला बॅक्टेरियाचा संसर्ग होऊ शकतो.

यकृतावर ताण - मेयोनेझमध्ये जास्त प्रमाणात संतृप्त चरबी असल्याने, शरीरात विषारी पदार्थांचे प्रमाण वाढते, ज्यामुळे यकृतावर दबाव येऊ शकतो.

## एका दगडाची किंमत

अनेक वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. एक हिरा व्यापारी होता जो हिऱ्यांचा एक महान तज्ञ मानला जात असे, परंतु एका गंभीर आजारामुळे त्याचे निधन झाले. त्याला पत्नी आणि एक मुलगा होता. मुलगा मोठा झाल्यावर त्याची आई म्हणाली- बेटा, मरण्यापूर्वी तुझ्या वडिलांनी हा दगड सोडला होता, तू तो बाजारात घेऊन जा आणि त्याची किंमत जाणून घे, लक्षात ठेव तुला फक्त किंमत शोधायची आहे, तो विकायचा नाही.

मुलगा दगड घेऊन बाहेर पडला, सर्वप्रथम त्याला भाजीपाला विकणारी एक महिला भेटली. अम्मा, या दगडाच्या बदल्यात तू मला काय देऊ शकतेस?, त्या तरुणाने विचारले. जर तुम्हाला द्यायचेच असेल मी दोन गाजरांच्या बदल्यात देईल... ते वजन करण्यासाठी उपयुक्त ठरेल. भाजी विक्रेता महिला म्हणाली.

तरुण पुढे सरकला. यावेळी तो एका दुकानदाराकडे गेला आणि त्याच्याकडून दगडाची किंमत जाणून घेऊ इच्छित होता. दुकानदार म्हणाला- याच्या बदल्यात, मी जास्तीत जास्त ५०० रुपये देऊ शकतो. जर तुम्हाला द्यायचे असेल तर द्या, नाहीतर पुढे जा.

यावेळी तो तरुण एका सोनारकडे गेला. सोनाराने दगडासाठी २० हजार रुपये देईल असे सांगितले.

मग तो एका प्रतिष्ठित हिऱ्याच्या दुकानात गेला जिथे त्याला दगडासाठी १ लाख रुपयांची ऑफर मिळाली आणि शेवटी तो तरुण शहरातील सर्वात मोठ्या हिऱ्या तज्ञाकडे गेला आणि म्हणाला कृपया मला या दगडाची किंमत सांगा. तज्ञाने दगडाची काळजीपूर्वक तपासणी केली आणि तरुणाकडे आश्चर्याने पाहत म्हणाला हा एक अमूल्य हिरा आहे, कोट्यवधी रुपये देऊनही असा हिरा मिळणे कठीण आहे.

तात्पर्य : जीवन हे देखील हिऱ्याप्रमाणे अमूल्य आहे आपण ते वाया घालवू नये तर त्याचे मूल्य ओळखावे.

# जीवन का अमृत (भाग १)



शक्तियाँ है और वह जिंदा बेदी है, जहाँ इंसान प्रार्थना कर सकता है और जन्म से मृत्यु तक की और उसके बाद की भी समस्याओं का हल पा सकता है। संत इंसान की पहुँच में, वह अकेला स्त्रोत है, जिसके द्वारा इंसान प्रभु से जुड़ सकता है।

६. संत का हर शब्द, हर नज़र, हर कदम, हर स्पर्श, यहाँ तक कि उसका वातावरण भी प्रभु की दया और प्रेम से भरपूर होता है। उसके चारों ओर का वातावरण आवेशित होता है।

७. सत्गुरु हमारी सभी आध्यात्मिक कोशिशों में ध्रुवतारे की तरह रास्ता दिखाता है। वह अपने उपदेशों के द्वारा शिष्य की बाहरी और आंतरिक हर प्रकार की सहायता करता है और उसे दृढ़ता से सही रास्ते पर बनाए रखता है। उसके रास्ते पर दूरी कोई मायने नहीं रखती। सत्गुरु की दया का हाथ, सदा शिष्य के ऊपर रहता है, चाहे वह दूर हो या पास,

### दया का हाथ

रेगिस्तान की जलती हुई रेत में, पर्वतों की बर्फ से ढकी चोटी पर या फिर सुनसान उजाड़ में।

जिस प्रकार एक भारी चुम्बक अपने चुम्बकीय क्षेत्र में जबरदस्त आकर्षण शक्ति रखती है, उसी प्रकार सत्गुरु, आध्यात्मिक जिज्ञासु पर अपनी शक्तियों के द्वारा एक स्वस्थ और दोष निवारक असर डालता है।

सत्गुरु प्रभु का प्रवक्ता है। वह ऐसा ध्रुव है, जिस पर प्रभु-सत्ता काम करती है। वह उस स्विच के जैसा है, जिसमें बिजली घर की शक्ति एकत्रित रहती है। सत्गुरु बाहर से देखने में एक आम इंसान जैसा लग सकता है। पर वह उससे बहुत कुछ ज्यादा है। वह एक पूर्ण इंसान है, जिसे बाहरी और आंतरिक जिंदगी, दोनों का अनुभव है। बाहरी अनुभव विभिन्न देशों में अलग-अलग होते हैं पर आंतरिक अनुभव कभी अलग-अलग नहीं होते। उसे (सत्गुरु को) परिभाषित किया जा सकता है कि वह रूहानियत से लबालब भरा है और इंद्रियों के घाट से ऊपर है।

उसने अपने आपको स्थूल और सूक्ष्म तत्व के विभिन्न कोशों से स्वतंत्र कर लिया है और अपनी रूहानी आँख से 'पूर्ण सच्चाई' को देख लिया है। वह इंसान में सोई हुई आध्यात्मिक संभावनाओं को विकसित करने में समर्थ है। उसे खुद प्रभु ने अपनी चुंबकीय शक्ति से अभिमंत्रित (सिद्ध) किया है। वह उस अनादि अनंत का प्रवक्ता है ।

उसके अंतर में अनंत (प्रभु) की ज्योति जगमगा रही है और वह दूसरों के दीयों को जलाने में समर्थ है। यह शुभ है कि ध्यान अभ्यास आपको मीठा लगता है और आप इसमें घंटों बैठना चाहते हैं। कोई चिंता न करो। सत्गुरु में पूरी आस्था रखो और भजन- सिमरन में सही तरीके से और विश्वास एवं प्रेम के साथ, नियमित रूप से समय दो। आप दिन-ब-दिन तरक्की करेंगे। आपकी भलाई के लिए गुरु-सत्ता सदा आपके सिर पर कार्यरत है।

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

# अंतरिक बल (भाग - २)

इस लिये विश्व में कहीं भी कुछ भी कोई हमारे बारे सोचता है उसे हमारा सहस्त्रार चक्र तुरंत ग्रहण कर लेता है और हम किसी के बारे कुछ भी सोचते हैं तुरंत उसे ब्राडकास्ट भी कर देता है।

सहस्त्रार चक्र की प्रत्येक पंखडी रूपी एरियल शरीर के प्रत्येक चक्र और विश्व और ब्रह्माण्ड से जुड़ा है।

सहस्त्रार चक्र -११-मूल आधार चक्र

सहस्त्रार चक्र का एक एरियल मूल आधार चक्र से जुड़ा हुआ है। कोई भी व्यक्ति संसार में हमारे बारे वासना का संकल्प करता है तो ये एरियल उसे प्राप्त करके मूल आधार चक्र को प्रेषित करता है। जिस से हमें अपवित्रता के विचार सताने लगते हैं। हमारे प्रति किसी विपरीत लिंग को जो खिंचाव होता है हमारे वह विचार भी इसी एरियल से जाते हैं।

सहस्त्रार चक्र - १२- स्वाधिष्ठान चक्र

हम जो कुछ नया बनाने का सोचते हैं या कोई हमारे को कुछ करने को कहता है, क्लास रूम में टीचर या सत्संग में बताया जाता है

### मणिपुर चक्र

या हम कोई भी कुछ नया सीखते हैं, यह सहस्त्रार चक्र का एक एरियल रिसीव कर के स्वाधिष्ठान चक्र को भेजता है। स्वाधिष्ठान चक्र उसी अनुसार निर्माण का कार्य करता है।

सहस्त्रार चक्र - १३ - मणिपुर चक्र

मणिपुर चक्र स्थूल और सूक्ष्म शरीर के लिए भोजन से शक्ति बनाने का कार्य करता है। भोजन से सम्बन्धित जो भी ज्ञान हम सुनते हैं, समझते हैं सहस्त्रार चक्र का एक एरियल इसे रिसीव करता है और मणिपुर चक्र को भेजता है। हम सम्पूर्ण भोजन खाते हैं और मणिपुर चक्र उसी अनुसार भोजन से शक्ति का निर्माण करता है।

सहस्त्रार चक्र - १४ अनाहत (हृदय) चक्र

हृदय चक्र शरीर की सभी कोशिकाओं को खून और ऑक्सीजन पहुंचाता है। सहस्त्रार चक्र का एक एरियल हृदय को सूचनाये देता है। अगर कोई हमारा दिल तोड़ता है, धोखा देता है या कोई अचानक सदमा लगता है तो ये सब संकल्प सहस्त्रार से हृदय को प्रभावित करते हैं और उसी अनुसार खून पर असर होता है जो शरीर में पहुंच कर रोग लगाते हैं।

सहस्त्रार चक्र - १५ विशुद्धि चक्र - कण्ठ चक्र

अगर कोई हमें बुरा भला बोलता है, गाली गलोच करता है, सहस्त्रार चक्र का एक एरियल रिसीव कर लेता है और विशुद्धि चक्र को भेज देता है और हम उसी अनुसार टिट फॉर टैट करने लगते हैं। सहस्त्रार चक्र - १६ आज्ञा चक्र

सहस्त्रार चक्र जो तरंगे रिसीव करता है वह पिचुटरी ग्रंथि को देता है। पिचुटरी ग्रंथि पिनियल ग्रंथि को सूचना देती है, जिस में आत्मा रहती है। आत्मा प्राप्त सूचना के अनुसार पिचुटरी ग्रंथि को वापिस निर्देश देती है। फिर पिचुटरी ग्रंथि सम्बंधित ग्रंथि को निर्देश देती है

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

महिला : यांना ठिक करा हो, हे रात्री झोपेत
मोठ्या मोठ्याने माझे नाव घेत असतात
डॉक्टर : ही तर चांगली गोष्ट आहे, तुम्ही फार लकी आहात,
स्त्री : कसली लकी, उद्या त्यांची बायको येणार आहे गावावरून !

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* भारतीय संघाचा वेगवान गोलंदाज मोहम्मद शमीने एकदिवसीय क्रिकेटमध्ये किती विकेटचा टप्पा पूर्ण केला आहे? - २०० विकेट

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आहारवेद - आरोग्य संवर्धन

१६) अंजिराचा उपयोग गळवांवरदेखील करता येतो. अंजीर चटणीसारखे बारीक वाटून गरम करून त्यांचे पोटीस बनवावे. ते पोटीस शरीरावर आलेल्या गाठीवर किंवा गळवावर बांधावे. दर दोन तासांच्या अंतराने नवे पोटीस करून बांधल्यास वेदना कमी होतात आणि ती अपरिपक्व गाठ परिपक्व होते. किंवा गळवा गळू लागते.

१७) सुके अंजीर, पिस्ता, बदाम, केशर, बेदाणे, खडीसाखर, वेलचीपूड हे सर्व पदार्थ एकत्रित

### तूप

करून बारीक करावे व ही पावडर गायीच्या तुपात एक आठवडाभर भिजत ठेवावी. त्यानंतर रोज सकाळी दोन चमचे हे मिश्रण खावे. त्यामुळे आजारपणात क्षीण झालेली शक्ती परत प्राप्त होतेच व शारीरिक, मानसिक उत्साह वाढतो.

सावधानता : बहुगुणी अंजीर जसे उपयुक्त आहे, तसेच ते पचायलाही जड आहे. त्यामुळे जास्त प्रमाणात खाल्ल्यास परिणामी पोटात दुखणे सुरु होते. अंजीर अति प्रमाणात खाल्ल्यास अपचन होऊन अनेक आजार उद्भवू शकतात म्हणून पचनशक्तीचा अंदाज घेऊन योग्य प्रमाणातच अंजीर खावेत.

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांड्ळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर
मोबाईल नं- ८७९३४००४००

# उर्दू ही अस्सल हिंदुस्तानी भाषा, त्याची गोडी मनाला भुरळ घालते

### सुनील कडासने यांचे प्रतिपादन; साहित्य परिषदेच्या विविध पुरस्कारांचे वितरण




अहमदनगर जिल्हा उर्दू साहित्य परिषदेच्यावतीने जिल्ह्यात साजरा करण्यात आलेल्या उर्दू अशरा कार्यक्रमाचा समारोप आणि जिल्ह्यातील उर्दू शिक्षकांना विविध पुरस्कार प्रदान करण्याचा समारंभ झाला. अध्यक्षस्थानी माजी आयपीएस अधिकारी सुनील कडासने हे होते.

नगर – उर्दू भाषा ही अस्सल भारतीय भाषा आहे. संस्कृती संवर्धनामध्ये उर्दू भाषेचा फार मोठा सहभाग आहे. जीवनाचे सर्व रंग उर्दू भाषेमध्ये पाहायला मिळतात. ही भाषा मनाला भुरळ घालते. उर्दू शायरी जीवनाच्या प्रत्येक अंगाला स्पर्श करते असे प्रतिपादन माजी आयपीएस अधिकारी सुनील कडासने यांनी केले.

अहमदनगर जिल्हा उर्दू साहित्य परिषदेचे वतीने जिल्ह्यात साजरा करण्यात आलेल्या उर्दू अशरा म्हणजे दहा दिवसांच्या उर्दू भाषेच्या विविध कार्यक्रमाचा समारोप आणि जिल्ह्यातील उर्दू शिक्षकांना विविध पुरस्कार प्रदान करण्याचा समारंभ अहमदनगर येथील एन एम गार्डन येथे झाला. अध्यक्षस्थानी माजी आयपीएस अधिकारी सुनील कडासने होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून बालभारती पुण्याचे उर्दू अधिकारी नवेदुल हक खान, मोहम्मदीया एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक व प्रमुख कार्यवाह डॉ.प्रा. अब्दुस सलाम शेख, उर्दू बचाव समितीचे राज्य अध्यक्ष अब्दुल्ला हसन चौधरी, पुणे जिल्हा परिषदेचे विस्तार अधिकारी शब्बीर लालू शेख, कुलसूम मुनीर फाउंडेशन पुण्याचे अध्यक्ष रिजवान मुनीर शेख, परिषदेचे उपाध्यक्ष के के खान, सहसचिव डॉ.कमर सुरूर, डॉ. जहीर मुजावर, शिक्षण विस्तार अधिकारी राज मोहम्मद शेख, माजी शिक्षण विस्तार अधिकारी सुगराबी पठाण, अलीम शेख, अश्फाक शेख, ए एस आय रियाज इनामदार, माजी पी आय अन्सार इनामदार, जवाहरलाल नेहरू उर्दू सेंटरचे अध्यक्ष मोहम्मद इदरिस शेख, एन एम फाऊंडेशनचे सय्यद जाहीद शाह निजाम आदी उपस्थित होते.

यावेळी माजी आयपीएस अधिकारी सुनील कडासने यांनी अस्खलित उर्दूमध्ये भाषण करून आपल्या शेरोशायरीने उपस्थितांची मने जिंकली. त्यांनी कुरआन सह सर्व धर्मग्रंथांचे दाखले देत समस्त मानव जातीच्या कल्याणासाठी ईश्वराने आपल्याला निर्माण केले आहे. त्यामुळे आपण कोणाचाही द्वेष न बाळगता एकमेकांशी प्रेमाने जगले पाहिजे असे आवाहन केले.

बालभारतीचे उर्दू ऑफिसर नवेदुलहक खान यांनी बालभारती मध्ये पुस्तकांची निर्मिती कशा पद्धतीने केले जाते याचा सविस्तर आढावा घेतला.

प्रस्ताविक भाषणात उर्दू साहित्य परिषदेचे जिल्हाध्यक्ष सलीमखान पठाण यांनी गेल्या वीस वर्षापासून जिल्ह्यात उर्दू सप्ताह साजरा केला जातो यावर्षी सुद्धा जिल्ह्यातील सर्व उर्दू शाळांनी यामध्ये सहभाग घेतला. चार हजार विद्यार्थी यामध्ये सहभागी झाले असे सांगून उर्दू ही अविट गोडीची भाषा असून उर्दू भाषेच्या प्रगतीसाठी सर्वांनी योगदान द्यावे असे आवाहन केले.

यावेळी उर्दू अशरा मध्ये सहभागी जिल्ह्यातील सर्व शाळांना स्मृतिचिन्ह तसेच सर्व विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले.

याप्रसंगी जिल्ह्यातील शकील खान, हाजी शकील बागवान, हारुण कुरेशी, मोहम्मद हनीफ शेख, सय्यद मुदस्सर सुलताना, अफसाना तांबोळी, शाहाना लोधी, जाकेरा शेख, अनिसा शेख, समीना साचे, आसमा मुलानी, मुबशीर खान, नसीम शेख, तरन्नुम खान, निशातअख्तर पठाण, शाहीन अहमद, जाहिदा शेख, मिनाज पटेल व रुबीना तांबोळी यांना मोहसीने तालीम अवॉर्ड तर कलीम शेख, समीना शेख, मेहरूनिसा खान, गौसिया शेख, सुमय्या शेख यांना खिदमते उर्दू अदब अवॉर्ड व नुजहत सय्यद, नसरीन इनामदार, सायरा बानो शेख, शमजा बागवान व अंजूम शेख यांना फातिमा बी शेख पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन समीना शेख व नाजेमा शेख यांनी केले. परिषदेचे खजिनदार फैयाज शेख यांनी आभार मानले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिषदेचे सचिव आबिद दुलेखान, कार्याध्यक्ष शाकीर शेख, उपाध्यक्ष इमाम सय्यद, सदस्य नवेद मिर्झा, बदर शेख, सय्यद सदाकत हुसेन, वसीम शेख, नर्गिस इनामदार, डॉ.शमा फारुकी, फैरोज हसन, शबनम शेख, मिनाज शेख, सलीम शेख जुलूस, नौशाद सय्यद, शाहनवाज गुलाब, अरबाज पठाण, फिरोजखान पठाण, स्थानिक नियोजन समितीचे हाजी शरफोद्दीन शेख, समीना शेख, शमजा बागवान, अस्मा शेख, फरजाना सय्यद, फरहत शेख, नाजेमा शेख, नाजीया शेख, सुमय्या सय्यद, आसिफ शेख, साजिद कुरेशी, मतीन मणियार आदींनी परिश्रम घेतले.

# प्रेरणादायी अक्षरधन

## कीर्तन परंपरा

संकलन: दिशान फिचर्स

द्वैतभावाचे सांगणे, अद्वैतभावाचे ऐकणे पण प्रेमभावाचे होणे म्हणजे कीर्तन होय. कीर्तनात कीर्तनकार वेगळे आणि श्रोतेही वेगळे. इथे द्वैत आहे पण सांगणारे जे सांगणार, तेच ऐकणारे कानात साठविणार आहेत. ऐकण्यात अद्वैत आहे पण द्वैत–अद्वैत याच्या पलीकडचा प्रेमरूप परमात्मा ज्याने अंतरंगात उभा राहतो असा प्रेमभाव कीर्तनात ओसंडून वाहतो आहे.

संत एकनाथ महाराज कीर्तनाचे मोठेपण सांगताना म्हणतात...

जेणे करूनि मूर्ती ठसावी
अंतरी श्रीहरीची ।
ऐसी कीर्तन मर्यादा आहे
संतांच्या घरची।

ज्यातून देवत्व आणि दिव्यत्व उभे राहते अशी सत्कृती म्हणजे कीर्तन होय. भागवतामध्ये 'श्रवणं–कीर्तनं विष्णोः' या श्लोकात नवविधा भक्ती वर्णिली आहे. या नवविधा भक्तिमध्ये दुसरा भक्तिप्रकार म्हणून कीर्तनाला अत्यंत महत्त्व आहे. कीर्तन कला ही कीर्तनभक्तिच्या रूपात प्रथम अवतरली आणि कीर्तनभक्तिची एक अवस्था म्हणून लोकप्रिय झाली. कीर्तन म्हणजे भक्तिचे सामाजिकरण, कीर्तन म्हणजे भक्तिचा सामूहिक आविष्कार. उपनिषद काळात कीर्तनाचा उगम झाला असला तरी ही संस्था पुराणकाळात ऊर्जितावस्थेत आली.

विष्णुपुराण, स्कंदपुराण, पद्मपुराण या प्रमुख पुराण ग्रंथातून कीर्तनाचे उल्लेख आढळतात. भारतीय आचार परंपरेतील नारद, व्यास, शुक, परिक्षित, वाल्मिकी इत्यादी श्रेष्ठ भक्तांची नावे कीर्तनपरंपरेशी जोडली आहेत. कीर्तनाचे गुणसंकीर्तन, लीलासंकीर्तन आणि नामसंकीर्तन असे तीन प्रकार सांगितले आहेत. भगवंताचा गुणानुवाद किंवा तत्त्वचिंतानुवाद हे गुणसंकीर्तन त्याचे चरित्रगायन हे लीलासंकीर्तन तर नामगजर हे नामसंकीर्तन होय.

विविध संप्रदायाच्या पद्धतीप्रमाणे वारकरी कीर्तन, नारदीय किंवा हरिदासी कीर्तन, रामदासी कीर्तन, गाडगेबाबा सांप्रदायिक कीर्तन, भराड हरिकथा अशा सादरीकरणाच्या विविध अंगाने आजही जनमानसात कीर्तनकला लोकप्रिय आणि लोकाभिमुख झाली आहे. कीर्तन हे जसे माणसाला प्रिय आहे तसे देवांनाही. दैवीकीर्तनाचे वर्णन भागवतात आले आहे. त्या कीर्तनात प्रल्हादाने ताल धरला म्हणजे टाळ वाजविला. देवर्षि नारदांनी वीणा वाजवली. अर्जुन रागदारीत गायन करू लागला. इंद्राने पखवाज वाजविला आणि सनकादिकांसह शुकदेवांनी कीर्तन केले आणि प्रत्यक्ष श्रीहरी त्या कीर्तनात नाचू लागले. देवाने देवपण विसरावे, भक्ताने भक्तपण विसरावे आणि एकरूप होऊन नाचावे ही अद्वैतावस्था कीर्तनातच अनुभवायला मिळते. आजच्या अभिजात रंगभूमीचा जन्म लोकरंगभूमीत आणि लोककलांमध्ये झाला आहे. लोककलांचा जन्म लळीतात, लळीताचा भारुडात, भारुडाचा हरिकीर्तनात तर हरिकीर्तनाचा जन्म भागवतातून झाला आहे.

– किशोर गांधी

### संत निरंकारी मिशनच्या वतीने 'प्रोजेक्ट अमृत' अंतर्गत

# कापूरवाडी तलावासह देशभरात ५०० ठिकाणी २२ फेब्रुवारीला स्वछता अभियानाचे आयोजन




नगर – संत निरंकारी मिशनच्या वतीने 'प्रोजेक्ट अमृत' अंतर्गत 'स्वच्छ जल, स्वच्छ मन' या अभियानाच्या चौथ्या टप्प्याचा शुभारंभ २२ फेब्रुवारी रोजी सकाळी ८ ते ११ वाजेपर्यंत सतगुरु माता सुदीक्षा जी महाराज यांच्या पावन मार्गदर्शनाखाली ही महामोहीम देशभरातील १५०० हुन अधिक ठिकाणी एकाच वेळी आयोजित केली जाईल. ज्यामुळे जलसंधारण आणि स्वच्छतेचा संदेश अधिक प्रभावीपणे समाजापर्यंत पोहोचेल. निरंकारी मिशनच्या नगर शाखेच्यावतीने सुद्धा बुऱ्हाणनगर जवळील कापूरवाडी तलाव व परिसरात वरील वेळेत जलस्वच्छता अभियान राबविण्यात येईल. यात निरंकारी सेवादल सदस्य व अनुयायी सहभागी होतील असाच उपक्रम नगर जिल्ह्यातील मिशनच्या शाखा असलेल्या २० ठिकाणी जलसाठ्यांच्या परिसरात स्वच्छता केली जाणार असल्याची माहिती मिशनच्या अहिल्यानगर क्षेत्र प्रमुख हरिष खुबचंदानी यांनी दिली.

# 'महाराष्ट्र शासना'च्या हिंदुहृदयसम्राट वंदनीय बाळासाहेब ठाकरे आरोग्य रत्न पुरस्कारासाठी डॉक्टर शारदा महांडुळे यांची निवड



नगर – हिंदुहृदयसम्राट वंदनीय बाळासाहेब ठाकरे आरोग्य रत्न पुरस्कार महाराष्ट्र शासन २०२५ यासाठी डॉक्टर शारदा निर्मळ महांडुळे यांची निवड करण्यात आली आहे.

गेल्या २५ वर्षापासून त्या वैद्यकीय आणि सामाजिक क्षेत्रात कार्यरत आहेत. जिल्हा परिषदेच्या अंतर्गत संपूर्ण महाराष्ट्रभर त्यांनी विविध शाळा, कॉलेज मधून लैंगिक शिक्षण, मासिक पाळीच्या समस्या याबद्दलचे मुलींना मोफत मार्गदर्शन व शिबीर घेतली आहेत. शिवाय जिल्हा परिषदेतील मार्फत अंगणवाडी सेविकांना गर्भसंस्कार आणि बालसंगोपन यांचे मोफत प्रशिक्षण दिले आहे. तसेच गर्भीनिप्राश आणि सूर्यप्रकाश यांचे दुर्वांकुर आयुर्वेद च्या माध्यमातून संशोधन करून अनेक वंधत्वाच्या जोडप्यांना संतती सुख दिले आहे. आत्तापर्यंत २५ हजार पेक्षा जास्त रुग्णांना त्यांच्या वंधत्वाच्या संशोधन आणि स्वनिर्मित औषधांचा फायदा झालेला आहे. आयव्हीएफ उपचार अयशस्वी झालेल्या रुग्णानाही त्यांच्या संशोधनातून संतती प्राप्त झालेली आहे. आयुर्वेदाचा प्रचार प्रसार व्हावा म्हणून त्यांनी अनेक कार्यशाळांमध्ये सहभाग घेऊन विद्यार्थ्यांना मोफत मार्गदर्शन केले आहे तसेच दूरदर्शन आकाशवाणी आणि विविध वृत्तपत्रांमधून त्या स्त्रियांच्या आरोग्या विषयी जनजागृती केली आहे. समाजात त्यांना मानाचे स्थान मिळावे म्हणून एकल महिलांसाठी त्यांनी एकटीच या वळणावर हे पुस्तक लिहिलेले आहे. स्त्रियांच्या आरोग्य विषयी जनजागृती व्हावी यासाठी स्वयं लिखित एकूण पाच पुस्तके प्रकाशित झाले आहेत त्यांच्या संशोधनाची दखल ही आंतरराष्ट्रीय स्तरावर झालेली आहे आणि त्यांचे संशोधनाची नोंद ही आत्तापर्यंत सात विश्वविक्रम यादीत झालेले आहे.


डॉक्टर शारदा डॉक्टर यांच्या सामाजिक क्षेत्र व आरोग्य क्षेत्रात स्वनिर्मित औषधे आणि स्वलिखित आरोग्य विषयक पुस्तके, व्याख्यानमाला यां सर्व कार्याची दखल घेऊन हा पुरस्कार यशवंतराव चव्हाण सभागृह मुंबई येथे २२ फेब्रुवारीला देण्यात येणार आहे. माननीय मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, आरोग्य मंत्री यांच्या उपस्थितीत हस्ते देण्यात येणार आहे. पुरस्काराचे स्वरूप एक लाख रुपये शाल श्रीफळ आणि प्रमाणपत्र.

# अमेरिकेतील 'साऊल आर्टिस्ट जर्नल' या आंतरराष्ट्रीय मासिकाने आपल्या अंकात अहिल्यानगरच्या चित्रकार अनुराधा ठाकूर यांच्या अजोड कलाकृतींना विशेष स्थान

नगर – अमेरिकेतील 'साऊल आर्टिस्ट जर्नल' या आंतरराष्ट्रीय मासिकाने आपल्या अंकात अहिल्यानगरच्या चित्रकार अनुराधा ठाकूर यांच्या अजोड कलाकृतींना विशेष स्थान दिले आहे. आदिवासी जीवनातील 'रस' आणि त्यांचा अदम्य उत्साह ठाकूर यांच्या १८ चित्रांच्या माध्यमातून या मासिकाच्या तब्बल २५ पानांवर दिमाखात झळकला आहे.

हे मासिक निसर्गाच्या ऋतूचक्रावर आधारित आहे. नुकताच प्रसिद्ध झालेला हा अंक 'हिवाळा विशेषांक' असून त्याची संकल्पना 'रस' अशी होती. मासिकाच्या संपादिका डॉ. आर. आर. शक्ती यांनी अनुराधा ठाकूर यांच्याशी संपर्क साधून त्यांची मुलाखत घेतली. या मुलाखतीत अनुराधा यांनी मांडलेला आदिवासींचा जीवनसंघर्ष आणि त्या संघर्षातही त्यांनी जपलेला आनंद वाचकांना मंत्रमुग्ध करणारा आहे.





अनुराधा ठाकूर यांच्या कुंचल्यातून साकारलेली चित्रे म्हणजे केवळ रंग रेषा नसून तो एक जिवंत अनुभव आहे.

या विशेष अंकातून जगभरातील रसिकांना त्यांनी अनुभवलेले रात्रीच्या वेळी शेकोटीभोवती रंगलेले पारंपारिक 'रेला' नृत्य आणि त्यामधून समजले की आपण अनेकदा 'परफेक्ट' होण्याच्या मागे लागतो, पण खर्या आनंदासाठी स्वतःच्या अपूर्णतेचा स्वीकार करणे गरजेचे असते.

ढेकी म्हणजे लाकडी मुसळाने तांदूळ कुटताना गाणी गाणार्या महिला आणि बांबूच्या टोपलीत निवांत झोपलेले बाळ. निसर्गाने जिथे रंगांची उधळण नाकारली, तिथे कच्छमधील स्त्रिया आपल्या उत्साही ताकदीने कापडावर सुई–दोर्याने नवनवीन 'कथा' विणतात.

झाबुआचा 'भगोरिया' सण, जिथे आपण नेहमी 'सर्वकाही ठीक झाल्यावर' आनंदी व्हायचे ठरवतो. पण ह आदिवासी बांधव शिकवतात की, परिस्थिती कशीही असो, 'साजरे करणे' हीच जीवनातील सर्वात मोठी परिपूर्णता आहे. इथे मानवी मनातील अपूर्णता उत्सवाच्या रंगात विरून जाते.

रस म्हणजे एखादी घटना घडून गेल्यानंतरही मनात रेंगाळणारा तो खोल अनुभव... आणि हेच माझ्या चित्रांचे सार आहे, अशा शब्दांत ठाकूर यांनी आपल्या कलेचे वर्णन केले आहे.

# अहिल्यानगर शहरात २३ व २४ फेब्रुवारी रोजी २ सर्जनशील नाट्यप्रयोगांचे संयुक्त आयोजन

### हौशी प्रायोगिक कलावंत संघ व गोवा कला संचालनालयाचा उपक्रम

नगर – हौशी प्रायोगिक कलावंत संघ (अहिल्यानगर जिल्हा शाखा) आणि गोवा सरकारच्या कला व सांस्कृतिक संचालनालय यांच्या संयुक्त विद्यमाने अहिल्यानगर येथे दोन सर्जनशील मराठी नाट्यप्रयोगांचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमांतर्गत २३ फेब्रुवारी रोजी सायं. ७ वाजता संगीत सावता माळी हा संगीतप्रधान नाट्यप्रयोग सादर होणार आहे. तसेच २४ फेब्रुवारी रोजी सायं. ७ वाजता रंगभूमीवर गाजलेले नटसम्राट हे मराठी नाटक सादर करण्यात येणार आहे. दोन्ही नाट्यप्रयोग माऊली सभागृह, झोपडी कॅन्टीन येथे होणार असून, अहिल्यानगरमध्ये प्रथमच दोन राज्यातील सांस्कृतिक संस्थांनी संयुक्तरीत्या असा नाट्यउपक्रम आयोजित केला आहे.

या नाट्य उपक्रमासाठी ग्लोबल व्हिजन अकॅडमी, सुनील वनाजी राऊत, अभिजित दरेकर, कुंश रेस्टॉरंट व नगर जिमखाना यांचे सहकार्य लाभले असून हा कार्यक्रम नगरकर नाट्यरसिकांसाठी विनामूल्य आहे. रसिक प्रेक्षकांनी उपस्थित राहून प्रतिसाद द्यावा, असे आवाहन संघाचे अध्यक्ष संजय लोळगे यांनी केले आहे.

## कलाभूषण पुरस्कार प्रदान

या कार्यक्रमाच्या निमित्ताने गोव्याचे ज्येष्ठ रंगकर्मी भालचंद्र उसगावकर यांना हौशी प्रायोगिक कलावंत संघ, अहिल्यानगर यांच्या वतीने यावर्षीचा कलाभूषण पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. रंगभूमीवरील त्यांच्या दीर्घ व उल्लेखनीय योगदानाबद्दल हा सन्मान देण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली.

# केडगाव (देवी) येथे २१ ते २८ फेब्रुवारी दरम्यान 'अखंड हरिनाम सप्ताहा'चे आयोजन

नगर – केडगाव (देवी) येथील रेणुका माता मंदिर परिसरात जागदंबा तरुण मंडळ व शिवमुद्रा ग्रुप यांच्या वतीने २२ वा रेणुका माता अखंड हरिनाम सप्ताह आयोजित करण्यात आला आहे. हा सप्ताह २१ ते २८ फेब्रुवारी या कालावधीत होणार आहे. या सप्ताहात अखंड हरिनाम, दुपारी तुकाराम गाथा पारायण, तसेच नामस्मरण, हरिपाठ व कीर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे. सप्ताहाचे व्यासनपीठ चालक म्हणून ह.भ.प. रामदास महाराज धिरसागर, तसेच ह.भ.प. बन्सी महाराज मोकाटे आणि ह.भ.प. मालती महाराज चन्ने यांची उपस्थिती राहणार आहे. पहाटे काकडा, सकाळी ग्रंथराज तुकाराम गाथा पारायण, सायंकाळी नामजप, रात्री हरिपाठ व त्यानंतर कीर्तन, तसेच जागर असा दैनंदिन कार्यक्रम ठेवण्यात आला आहे. सप्ताहात ह.भ.प. अर्जुन महाराज मोटे (परभणी), कबीराज महाराज झावरे (पारनेर), उमेश महाराज किरदत्त (सातारा), संतोष महाराज गोरे (सिंधखेड), महेश महाराज मडके (नेवासा), अशोक महाराज शिंदे (आणे जुन्नर) आणि जयेश महाराज भागवत (मुंबई) यांची कीर्तनसेवा होणार आहे. सप्ताहाचा समारोप २८ फेब्रुवारी रोजी होणार असून समारोपप्रसंगी ह.भ.प. श्रवण महाराज आहिरे (नाशिक) यांचे काल्याचे कीर्तन व त्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. या धार्मिक सोहळ्यासाठी परिसरातील भाविकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजक हयांच्या वतीने करण्यात आले आहे.

# रोग बरा करण्यापेक्षा तो टाळणे केव्हाही चांगले : डॉ. अजय वाबळे



डॉ.पाऊलबुधे फार्मसीत तोंड तपासणी आरोग्य शिबिरात रुग्णाची तपासणी करताना डॉ.अजय वाबळे. (छाया – विजय मते)

नगर – आज कर्करोगामुळे जगात मृत्यूचे दुसरे प्रमुख कारण होत आहे. लवकर निदान झाले तर कर्करोगावर उपचार करणे शक्य असते. शरीरातील पेशींचा अनियंत्रित वाढीमुळे हा आजार होतो, धुम्रपान, अस्वस्थकर आहार आणि बैठी जीवनशैली ही प्रमुख कारणे कर्करोगाची आहेत. रोग बरा करण्यापेक्षा हा रोग होऊ न देता तो टाळणे केव्हाही चांगले आहे त्यासाठी आवश्यक ती काळजी घेणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन दंतचिकित्सक डॉ.अजय वाबळे यांनी केले.

वसंत टेकडी येथील सेवा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित डॉ.एन.जे.पाऊलबुधे कॉलेज ऑफ फार्मसी मध्ये जागतिक कर्करोग दिनानिमित्त तोंडाची तपासणी व आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. डेंटल सर्जन व ओरल ऑन्कोपॅथॉलॉजिस्ट, ॲडव्हान्स्ड डेंटल ट्रीटमेंट अँड इम्प्लांट सेंटर चे डॉ.अजय वाबळे, डॉ.अनिकेत शिंदे, संस्थेचे सचिव रामकिसन देशमुख, खजिनदार दादासाहेब भोईटे आदी उपस्थित होते.

कार्यक्रमात कर्करोगाबाबत जनजागृती, तोंडाच्या कर्करोगाची लवकर लक्षणे ओळखणे, प्रतिबंधात्मक उपाय आणि नियमित तपासणीचे महत्त्व डॉ.शिंदे, डॉ.वाबळे यांनी शिबिरात सहभागी रुग्ण कॉलेजचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले. मोफत तोंड आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले. याचा लाभ असंख्य लोकांना झाला. यामध्ये तज्ज्ञांकडून प्रत्यक्ष मार्गदर्शन व प्रात्यक्षिक देण्यात आले.

कार्यक्रमासाठी प्राचार्य डॉ.श्याम पंगा, प्राचार्या अनुराधा चव्हाण, डॉ. रोशनी सूर्यवंशी, डॉ.प्रसाद घुगरकर, सौ.स्वाती कडनोर, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. हा कार्यक्रम फार्माकॉलॉजी व फार्मास्युटिकल केमिस्ट्री विभागामार्फत आयोजित करण्यात आला. अशा सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या उपक्रमांमुळे कर्करोगाविषयी जागरूकता निर्माण होण्यास मोठी मदत होत असल्याचे यावेळी सांगण्यात आले. कार्यक्रमास व्यवस्थापकीय संचालक साई पाऊलबुद्धे, सदस्य रघुनाथ कारमपुरी, संचालक यांनी शुभेच्छा दिल्या.

# वासन टोयोटाचे नवीन अत्याधुनिक '२S' सुविधांनी सुसज्ज वर्कशॉपचे उद्घाटन



केडगाव इंडस्ट्रियल इस्टेट (एमआयडीसी) परिसरात वासन टोयोटाचे नवीन, प्रशस्त आणि अत्याधुनिक '२S' सुविधांनी सुसज्ज अशा हायटेक वर्कशॉपचे उद्घाटन करताना आमदार संग्राम जगताप.

नगर – केडगाव इंडस्ट्रियल इस्टेट (एमआयडीसी) परिसरात वासन टोयोटाचे नवीन, प्रशस्त आणि अत्याधुनिक '२S' सुविधांनी सुसज्ज असे हायटेक वर्कशॉपचे उद्घाटन आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते झाले. तर महापालिकेचे महापौर, उपमहापौर यांच्यासह नगरसेवकांचा वासन टोयोटा परिवाराच्या वतीने सन्मान करण्यात आला. या सोहळ्याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून महापौर ज्योतीताई गाडे, उपमहापौर धनंजय जाधव, श्री विशाल गणेश मंदिर देवस्थानचे विश्वस्त प्रा. माणिक विधाते, गुणे आयुर्वेद महाविद्यालयाचे चेअरमन सचिन जगताप, वासन टोयोटाचे चेअरमन विजय वासन, शोरुमचे जनक आहुजा आदी उपस्थित होते.

प्रास्ताविकात अनिश आहुजा म्हणाले की, वासन टोयोटामध्ये दिवसंदिवस वाहनांची मोठ्या प्रमाणात विक्री होत आहे. विक्री पश्चात अद्यावत सोयी–सुविधा देण्यासाठी व काळाची गरज ओळखून अद्यावत तंत्रज्ञानानेयुक्त हायटेक वर्कशॉपची निर्मिती करण्यात आली आहे. याच बरोबर वासन टोयोटाच्या माध्यमातून सामाजिक उपक्रमाची त्यांनी माहिती दिली.

पाहुण्यांचे स्वागत जनक आहुजा यांनी केले. याप्रसंगी महापौर, उपमहापौर यांच्यासह नगरसेवकांचा विजय वासन यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी नवनिर्वाचित नगरसेवक उपस्थित होते.

हा सोहळ्या यशस्वी होण्यासाठी सीईओ तेजिंदर बेदी, व्ही.पी. सर्व्हिस श्रीकांत नायर, व्ही.पी. सेल्स अजय गुप्ता, अनिश आहूजा आदींसह सर्व सहकाऱ्यांनी परिश्रम घेतले. यावेळी शहरातील उद्योगपती, ग्राहक व नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रसाद बेडेकर यांनी केले.

## वासन टोयोटाचे अत्याधुनिक '२S' सुविधांनी सुसज्ज

नवीन वर्कशॉपमध्ये आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित '२S' सुविधा उपलब्ध करण्यात आल्या आहेत. ग्राहकांना दर्जेदार आणि जलद सेवा देण्याच्या उद्देशाने अत्याधुनिक उपकरणे, प्रशिक्षित तंत्रज्ञ आणि विस्तृत सेवा विभागाची उभारणी करण्यात आली आहे. वाहनांची सर्वसमावेशक तपासणी, देखभाल व दुरुस्ती तसेच डेंटिंग, पेंटिंग व अत्याधुनिक वॉश सुविधा एकाच छताखाली करण्याची सुविधा येथे उपलब्ध असणार आहे.

# शिवचरित्र हे जीवन जगण्याचा ग्रंथ

## प्रा. एकनाथ होले यांचे प्रतिपादन, भाग्योदय माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात शिवजयंती उत्साहात



भाग्योदय माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. शिवजयंतीनिमित्त विद्यालयातील विद्यार्थ्यांनी पारंपरिक मावळ्यांचा पोशाख परिधान केला होता.

नगर – शिवचरित्र हे केवळ इतिहास नसून जीवन जगण्याचा ग्रंथ. शिवचरित्रातून संकटांचा सामना कसा करायचा, अडचणींवर मात कशी करायची याची शिकवण मिळते. विद्यार्थ्यांची जिज्ञासू वृत्ती वाढीस लागण्यासाठी शिवचरित्राचे महत्त्व अनन्यसाधारण असल्याचे प्रा. एकनाथ होले यांनी व्याख्यानात नमूद केले. राष्ट्रप्रेम, राष्ट्रभक्ती, सुरक्षिता, अष्टप्रधान मंडळाची रचना, राज्यकारभार, किल्ल्यांचे संवर्धन व जतन, नेतृत्वगुण, शक्तीपेक्षा युक्ती भारी ही संकल्पना अशा अनेक गुणांची माहिती शिवचरित्रातून मिळते, असे त्यांनी स्पष्ट केले. बाजीप्रभू देशपांडे, बाजी पासलकर, तानाजी मालुसरे, मुरारबाजी, शिवा काशिद, प्रतापराव गुजर या मावळ्यांनी केलेले पराक्रम व त्यांचे समर्पण आजच्या पिढीसाठी प्रेरणादायी असल्याचे प्रा. होले यांनी सांगितले. महाराष्ट्राच्या स्वराज्यात अठरा पगड जाती व बारा बलुतेदार यांचा समन्वय साधून स्वराज्य उभारण्यात महाराजांनी यशस्वी वापर केल्याचेही त्यांनी अधोरेखित केले.

भाग्योदय माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. शिवजयंतीनिमित्त विद्यालयातील विद्यार्थ्यांनी पारंपरिक मावळ्यांचा पोशाख परिधान करून, भगवे फेटे व भगवे झेंडे हातात घेत जय भवानी, जय शिवाजीच्या घोषणांनी संपूर्ण शालेय परिसर दणाणून सोडला. ढोल–ताशे, झांज पथक, घोडे, बाल शिवाजी, लेझीम पथक व लाठीकाठी पथक अशा विविध पथकांनी मिरवणुकीत सहभाग घेतला. तसेच छत्रपती शिवाजी महाराज यांचा पोवाडा यावेळी सादर केला.

कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून इंग्लिश मीडियम स्कूलच्या संचालिका वैशाली कोतकर, ज्येष्ठ संचालक रघुनाथ लोंढे, विद्यालयाचे प्राचार्य ज्ञानदेव बेरड, रेणुकामाता प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक बन्सी नरवडे तसेच शिवचरित्राचे व्याख्याते प्रा. एकनाथ होले उपस्थित होते.

प्रा. एकनाथ होले यांनी आपल्या प्रभावी व्याख्यानात शिवचरित्र हे केवळ इतिहास नसून जीवन जगण्याचा ग्रंथ असल्याचे सांगितले. शिवचरित्रातून संकटांचा सामना कसा करायचा, अडचणींवर मात कशी करायची याची शिकवण मिळते. विद्यार्थ्यांची जिज्ञासू वृत्ती वाढीस लागण्यासाठी शिवचरित्राचे महत्त्व अनन्यसाधारण असल्याचे त्यांनी नमूद केले. राष्ट्रप्रेम, राष्ट्रभक्ती, सुरक्षिता, अष्टप्रधान मंडळाची रचना, राज्यकारभार, किल्ल्यांचेसंवर्धन व जतन, नेतृत्वगुण, शक्तीपेक्षा युक्ती भारी ही संकल्पना अशा अनेक गुणांची माहिती शिवचरित्रातून मिळते, असे त्यांनी स्पष्ट केले. बाजीप्रभू देशपांडे, बाजी पासलकर, तानाजी मालुसरे, मुरारबाजी, शिवा काशिद, प्रतापराव गुजर या मावळ्यांनी केलेले पराक्रम व त्यांचे समर्पण आजच्या पिढीसाठी प्रेरणादायी असल्याचे प्रा. होले यांनी सांगितले. महाराष्ट्राच्या स्वराज्यात अठरा पगड जाती व बारा बलुतेदार यांचा समन्वय साधून स्वराज्य उभारण्यात महाराजांनी यशस्वी वापर केल्याचेही त्यांनी अधोरेखित केले.

पुण्याच्या लाल महालात महाराजांनी केलेला सर्जिकल स्ट्राइकचा प्रयोग, सागरी सुरक्षेचे महत्त्व ओळखून सागरी किनारपट्टीवर आरमाराची स्थापना, त्यामुळे शिवाजी महाराज हे नौसेनेचे पहिले संस्थापक ठरले, अशी माहिती देण्यात आली. तोफा ओतण्याचा कारखाना, दारुगोळा तयार करण्याचा कारखाना उभारून महाराजांनी आत्मनिर्भरतेचा आदर्श घालून दिला. अर्थशास्त्र, भूगोल, इतिहास, राज्यशास्त्र, तर्कशास्त्र या सर्व शास्त्रांचा महाराजांनी अभ्यास केला होता. विविध ऋतू, सुट्ट्या, चंद्र–तारे, ग्रह–नक्षत्रे व ग्रहण यांचा मोहिमांच्या आखणीत यशस्वी वापर केल्याचेही त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी स्थानिक संस्थेचे ज्येष्ठ संचालक रघुनाथ लोंढे होते. इंग्लिश मीडियम स्कूलच्या संचालिका वैशाली कोतकर व भाग्योदय विद्यालयाचे प्राचार्य ज्ञानदेव बेरड यांनी विद्यार्थ्यांना शिवजयंतीच्या शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक बन्सी नरवडे यांनी केले. संजय शिंदे यांनी आभार मानले. सूत्रसंचालन दत्तात्रय पांडुळे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विद्यालयाचे शिक्षक बाबासाहेब कोतकर, डॉ. गोविंद कदम, सोपान तोडमल, प्रा. गोरक्ष कांडेकर, धनंजय बारगळ, संतोष काकडे, शिवाजी धस, आदिनाथ ठुबे, रूपाली शिंदे, सुनीता मेढे, गणेश गायकवाड, बाबासाहेब कावरे, सुधाकर गायकवाड आदींनी परिश्रम घेतले.




जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, एकविध जिल्हा क्रीडा संघटना तसेच जिल्हा क्रीडा संकुल, अहिल्यानगर येथील विविध खेळ प्रशिक्षण केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने या पदयात्रेचे आयोजन करण्यात आले होते.

# शिवरायांच्या ३९६ व्या जयंतीनिमित्त 'रायफल शुटिंग क्लब'ची पदयात्रा

## मैदानातील अचूक वेध घेणाऱ्या खेळाडूंनी महाराजांच्या शौर्याला केले वंदन

नगर – शस्त्रविद्येचे जनक व स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९६ व्या जयंतीनिमित्त अहिल्यानगर रायफल शूटिंग क्लबच्या वतीने उत्साहपूर्ण पदयात्रा काढून महाराजांना अभिवादन करण्यात आले. मैदानात अचूक नेमबाजीसाठी ओळखले जाणारे हे खेळाडू रस्त्यावर उतरून शिवरायांच्या शौर्य आणि पराक्रमाला वंदन केले.

जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, एकविध जिल्हा क्रीडा संघटना तसेच जिल्हा क्रीडा संकुल, अहिल्यानगर येथील विविध खेळ प्रशिक्षण केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने या पदयात्रेचे आयोजन करण्यात आले होते. शहरातील प्रमुख मार्गांवरून काढण्यात आलेल्या या पदयात्रेत खेळाडूंनी हातात भगवे झेंडे व घोषवाक्यांचे फलक घेऊन जय भवानी, जय शिवाजीच्या घोषणांनी वातावरण दणाणून सोडले.

या पदयात्रेत आमदार संग्राम जगताप, जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे, क्रीडा अधिकारी विशाल गर्जे, प्रियंका खिंडारे, संतोष वाबळे तसेच राष्ट्रीय प्रशिक्षक अलीम शेख, ऋषिकेश दरंदले, सागर फाटके आदींसह जिल्ह्यातील सर्व वरिष्ठ शासकीय अधिकारी सहभागी झाले होते.

पदयात्रेदरम्यान शिवरायांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकणारे संदेश देण्यात आले. नेमबाजी हा शिस्त, एकाग्रता आणि धैर्याचा खेळ असून, शिवरायांच्या युद्धकौशल्यातून प्रेरणा घेऊन खेळाडूंनी आपल्या क्रीडा क्षेत्रात यश संपादन करावे, असा संदेश यावेळी देण्यात आला.

या उपक्रमामुळे क्रीडा आणि शिवभक्ती यांचा सुंदर संगम अनुभवायला मिळाला. रायफल शूटिंग क्लबच्या खेळाडूंनी आपल्या शिस्तबद्ध आणि संघटित सहभागातून शिवजयंती साजरी करताना सामाजिक बांधिलकीही जपली. कार्यक्रमाच्या शेवटी सर्वांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस अभिवादन करून राष्ट्रभक्तीची शपथ घेतली.

# जिल्हा मराठा नागरी पतसंस्थेचा रौप्य महोत्सवानिमित्त शिवजयंतीदिनी ठेवीदारांना चांदीच्या नाण्यांचे वाटप

नगर – अहिल्यानगर जिल्हा मराठा नागरी पतसंस्थेच्या स्थापनेला पंचवीस वर्षे पूर्ण झाल्याच्या पार्श्वभूमीवर रौप्य महोत्सवी वर्ष उत्साहात साजरे करण्यात येत आहे. या महोत्सवानिमित्त आणि छत्रपती शिवाजी महाराज जयंतीच्या पावन दिनाचे औचित्य साधत आज एक लाख रुपयांच्या ठेवीवर पाच ग्रॅम वजनाचे चांदीचे नाणे ठेवीदारांना प्रदान करण्यात आले. हा विशेष वितरण समारंभ ज्येष्ठ मार्गदर्शक प्रा. पोपटराव काळे आणि डॉ. नीलिमा गोरे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला.

पतसंस्थेच्या प्रवासाबाबत माहिती देताना ज्येष्ठ संचालक व माजी उपाध्यक्ष किशोर मरकड यांनी सांगितले की, स्थापनेपासून आजवर पतसंस्थेने सातत्याने प्रगती केली असून सध्या मुख्य कार्यालयासह आठ शाखा यशस्वीपणे कार्यरत आहेत. येत्या काळात तालुकास्तरावर विस्तार करण्याचा मानस असून, पाईपलाईन रोड येथे नवी शाखा लवकरच सुरू करण्यात येणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. या विस्तारातून अधिकाधिक सभासदांना आधुनिक व विश्वासार्ह आर्थिक सेवा देण्याचा संस्थेचा उद्देश आहे.



अहिल्यानगर जिल्हा मराठा नागरी पतसंस्थेच्या रौप्य महोत्सवी वर्ष निमित्त आणि छत्रपती शिवाजी महाराज जयंतीच्या पावन दिनाचे औचित्य साधत एक लाख रुपयांच्या ठेवीवर पाच ग्रॅम वजनाचे चांदीचे नाणे ठेवीदारांना प्रदान करण्यात आले.

यावेळी मार्गदर्शन करताना प्रा. पोपटराव काळे म्हणाले की, पतसंस्थेच्या यशामागे सभासद, ठेवीदार आणि मराठा सेवा संघच्या कार्यकर्त्यांचे योगदान मोलाचे आहे. आर्थिक सक्षमतेसोबतच सामाजिक बांधिलकी जपत आदर्शवत काम करण्याचा वारसा संस्थेने जोपासला असून, हीच परंपरा पुढेही टिकवावी, असे आवाहन त्यांनी केले.

डॉ. नीलिमा गोरे यांनीही पतसंस्थेच्या कार्यपद्धतीचे आणि ठेवीदारांशी असलेल्या पारदर्शक व्यवहाराचे विशेष कौतुक केले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला राजश्री शितोळे यांनी स्वागत केले. प्रास्ताविक उपाध्यक्ष बाळकृष्ण काळे यांनी केले ते म्हणाले की या योजनेत एक लाख रुपयांपेक्षा अधिक ठेव असलेल्या ठेवीदारांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला आहे. या योजनेअंतर्गत सहभागी सभासदांना त्यांच्या संबंधित शाखा कार्यालयांमध्ये चांदीच्या नाण्यांचे वितरण टप्प्याटप्प्याने करण्यात येणार आहे. यानंतर पात्र सभासदांना चांदीच्या नाण्यांचे वितरण करण्यात आले. सतीश इंगळे यांनी आभार मानले.

कार्यक्रमास कल्पना ठुबे, किसनराव पायमोडे, द्वारकाधीश राजभोसले, उदय अनभुले, लक्ष्मणराव सोनळे, ॲड. राजेश कावरे, अच्युत गाडे, ज्ञानदेव पांडुळे, विठ्ठलराव ठोकळ, संपूर्णा सावंत, साहेबराव पांडुरंग पालवे, सूर्यकांत जंजिरे, संतोष वाडेकर, महेश वरपे, मच्छिंद्र बेरड सुपेकर, नंदिनी सोनळे, करुणा काळे, योगिता कर्डिले, शोभा भालसिंग, अशोक वारकड, बबन सुपेकर, प्रशांत बोरुडे, रणजीत रक्ताटे, मनेश रोहकले, अनुपमा सोनाळे, पुष्पा इंगळे, कविता ढोणे, दीपमाला पवार आदी उपस्थित होते. याशिवाय मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष संभाजी दहातोंडे आणि जिजाऊ ब्रिगेडच्या जिल्हाध्यक्ष नंदिनी सोनावळे आदी उपस्थित होते.



माऊंट सिनायमध्ये शिवजयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

# माऊंट सिनायमध्ये शिवजयंती उत्साहात साजरी

नगर – सारोळा बद्दी येथील माऊंट सिनाय कॉन्व्हेंट स्कूलमध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९६ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. प्रमुख पाहुणे म्हणून अहिल्यनगर येथील न्यू आर्टस्, कॉमर्स अँण्ड सायन्स कॉलेजचे प्राध्यापक डॉ. मच्छिंद्र मालूंजकर उपस्थित होते.

प्रारंभी प्रमुख पाहुणे डॉ. मच्छिंद्र मालूंजकर व मुख्याध्यापिका जयश्री खरात यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यांनतर विद्यार्थ्यांची समयोचित भाषणे झाली व इयत्ता सातवीच्या च्या विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनावर आधारित नाटिका व इयत्ता आठवीच्या विद्यार्थीनींनी पोवाडा सादर केला. तसेच विद्यालयाच्या शिक्षिका अर्चना केदार यांनीही पोवाडा सादर केला.

याप्रसंगी बोलताना प्रमुख पाहुणे डॉ.मालूंजकर यांनी ही छत्रपती शिवाजी महाराजांचा जीवनपट विषद केला.

प्रमुख पाहुण्यांचा परिचय आर्या कुर्हाडे हीने करून दिला. आयान घोडके याने आभार मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आराध्या बानिया, कौस्तुभ गायकवाड व समर्पण राज या विद्यार्थ्यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अर्चना केदार, उज्वला पंडित, किशोर उबाळे व मुजाहिद शेख यांनी परिश्रम घेतले

# छत्रपती शंभुराजे चौक मित्र मंडळाची वंचितांसोबत शिवजयंती

नगर – आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज जयंती शंभुराजे मित्र मंडळामार्फत सालाबादानुसार उत्साहात साजरी करण्यात आली. गेल्या १२ वर्षांपासून हा उपक्रम अखंड राबवला जात आहे. सकाळी दुर्गादेवी नय्यर शाळेच्या विद्यार्थ्यांनी शिवजयंती निमित्ताने रॅली काढली होती, त्या मधील विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले. परिसरातील बालचमु व बालघरचे वंचित विद्यार्थ्यांनी या सोहळ्यात सहभाग नोंदवला.



छत्रपती शंभुराजे चौक मित्र मंडळाने वंचितांसोबत शिवजयंती साजरी केली.

१० वी – १२ वी च्या बोर्ड परीक्षा सुरू असल्यामुळे कुठलेही ध्वनी व वायु प्रदूषण होऊ न देता कार्यक्रम नियोजनात पार पाडण्यात आला.

संध्याकाळी कृष्णा पुंड या बालकाने शिवाजी महाराजांचा पोवाडा गाऊन व अभिनय करून उत्कृष्ट सादरीकरण केले.

बालघरच्या वंचित विद्यार्थ्यांच्या हस्ते व अहिल्यानगरच्या प्रथम नागरिक महापौर सौ. ज्योती अमोल गाडे यांच्या हस्ते जिजाऊ वंदना करण्यात आली व महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कु. श्रावणी वाखुरे, अवनी जोशी, वेदिका वाडेकर, विराज वाखुरे, दक्ष दहातोंडे, सौ. जया वाखुरे, सौ. पवार, सौ. राजश्री नगरे, सौ. दहातोंडे, सौ. पुजा वाडेकर, सौ. प्रियंवदा जोशी, सौ. दिपाली जगताप, शैला साबळे, प्रदीप वाखुरे, ॲड. विक्रम वाडेकर, अमोल गाडे, राहुल जोशी, राजू नगरे, शंतनु पांडव, विकास जोशी, राहुल काळे, राहुल पवार, दत्ता दहातोंडे, सचिन निक्रड, प्रशांत पवार, दत्ता चव्हाण, शिवाजी वाघमोडे, अविनाश निक्रड, कैलास गाडे आदींनी परिश्रम घेतले.





अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या शिवजयंती मिरवणुकीमध्ये नेप्ती येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज अभियांत्रिकी महाविद्यालय येथील विद्यार्थी विद्यार्थिनींनी दरवर्षीप्रमाणे सक्रिय सहभाग नोंदवत ढोल, ताशा, लेझिम, लाठीकाठी, शिवकालीन युद्ध अशा नानाविध प्रकारच्या कालविष्कारांसह विविध कलागुण साजरे करत मिरवणुकीमध्ये सहभाग नोंदवला.

# छत्रपती अभियंत्रिकीच्या विद्यार्थ्यांचा शिवजयंती मिरवणुकीमध्ये जल्लोष

नगर – अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या शिवजयंती मिरवणुकीमध्ये नेप्ती येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज अभियांत्रिकी महाविद्यालय येथील विद्यार्थी विद्यार्थिनींनी दरवर्षीप्रमाणे सक्रिय सहभाग नोंदवत ढोल, ताशा, लेझिम, लाठीकाठी, शिवकालीन युद्ध अशा नानाविध प्रकारच्या कालविष्कारांसह विविध कलागुण साजरे करत मिरवणुकीमध्ये जल्लोष, उत्साह आणि आनंदाने सहभाग नोंदवला. माळीवाडा येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज पुतळा येथून सकाळी ७.३० वाजता निघालेली मिरवणूक सुमारे ५ तास वाजत गाजत नगर शहरामध्ये माळीवाडा, कापडबाजार, दिल्लीगेटमार्गे ढोल ताशांच्या गजरात रेसिडेन्सील विद्यालयापर्यंत सुरू होती.

या शिवजयंती उत्सवाची जय्यत तयारी मागील १० दिवसापासून महाविद्यालयामध्ये विद्यार्थी करत होते. सहभागी विद्यार्थ्यांचे कौतुक करत शिवजयंती हा उत्सव विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देत आपली स्वतंत्र ओळख निर्माण करण्यासाठी देखील विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करत असतो, असे प्रतिपादन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाय. आर. खर्डे यांनी केले.

विविध कलाप्रकार सादर करण्यासाठी आणि विद्यार्थ्यांची प्रात्यक्षिकं सराव साठी मार्गदर्शक म्हणून शारीरिक शिक्षण संचालक प्रा. अविनाश हंडाळ, प्रा. तेजश्री धंगेकर आदींनी मेहनत घेतली. राष्ट्रीय सेवा योजना विद्यार्थ्यांनी देखील उल्लेखनीय सहभाग नोंदवला. कार्यक्रमास सर्व विभागप्रमुख डॉ. एम. के. भोसले, डॉ. एस. एम. वाळके, प्रा. पी. जी. निकम, प्रा. ए. बी. काळे, प्रा. एस. पी. विधाते, डॉ. व्ही. व्ही. पाटील, प्रा. बी. एन. खरड, प्रा. पी. आर. मुटकुळे यांच्यासमवेत सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी देखील उपस्थित होते.

अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज या संस्थेचे अध्यक्ष रा.ह.दरे, उपाध्यक्ष डॉक्टर विवेक भापकर, सचिव ॲड. विश्वासराव आठरे पाटील, सहसचिव मुकेश मुळे, खजिनदार ॲड. दीपलक्ष्मी म्हसे तसेच संस्था सदस्य–पदाधिकारी यांनीदेखील सहभागी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

# लक्ष्मी भाऊराव पाटील विद्यालयात शिवजयंती उत्साहात

## शिवकालीन वेशभूषेतील विद्यार्थ्यांनी वेधले लक्ष; शिवचरित्रातून विद्यार्थ्यांना स्वाभिमान, शौर्य आणि संस्कारांचा संदेश

नगर – रयत शिक्षण संस्था संचलित कापड बाजार येथील लक्ष्मी भाऊराव पाटील प्राथमिक व माध्यमिक विद्यालयात छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराज व राजमाता जिजाऊ यांच्यासह शिवकालीन वेशभूषेत आलेल्या विद्यार्थ्यांनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले. कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादनाने करण्यात आली. यावेळी माध्यमिक विभागाच्या प्राचार्या छायाताई काकडे, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका लक्ष्मीताई आहेर, सांस्कृतिक विभाग प्रमुख एस. एम. गारुडकर, श्रीमती एस. व्ही. दोमल, ज्येष्ठ शिक्षक महादेव भद्रे तसेच विद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालक उपस्थित होते.



रयत शिक्षण संस्था संचलित कापड बाजार येथील लक्ष्मी भाऊराव पाटील प्राथमिक व माध्यमिक विद्यालयात छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराज व राजमाता जिजाऊ यांच्यासह शिवकालीन वेशभूषेत आलेल्या विद्यार्थ्यांनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी शिवगर्जना सादर करून वातावरणात उत्साह संचारला. समूह नृत्य, देशभक्तिपर गीते, प्रेरणादायी पोवाडे आणि प्रभावी भाषणांमधून विद्यार्थ्यांनी शिवरायांचा पराक्रम, दूरदृष्टी आणि स्वराज्य स्थापनेचा इतिहास प्रभावीपणे उलगडला. काही विद्यार्थ्यांनी अफजलखान वध, सिंहगड विजय यांसारख्या ऐतिहासिक प्रसंग आपल्या सादरीकरणातून जीवंत करुन उपस्थितांची मने जिंकली.


प्राचार्या छायाताई काकडे म्हणाल्या की, छत्रपती शिवाजी महाराज हे केवळ एक राजा नव्हते, तर ते आदर्श नेतृत्व, दूरदृष्टी, पराक्रम आणि सुशासन यांचे प्रतीक होते. त्यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत स्वराज्याची स्थापना करून संपूर्ण जगाला प्रेरणा दिली. आजच्या पिढीने शिवरायांकडून स्वाभिमान, धैर्य, शिस्त आणि राष्ट्रप्रेम या मूल्यांचा वारसा घेण्याचे त्यांनी सांगितले.

मुख्याध्यापिका लक्ष्मीताई आहेर म्हणाल्या, राजमाता जिजाऊंच्या संस्कारातून घडलेले शिवाजी महाराज हे आदर्श पुत्र, आदर्श राजा आणि आदर्श मानव होते. लहानपणापासूनच जिजाऊंनी त्यांच्यात देशप्रेम, न्यायप्रियता आणि पराक्रमाची बीजे रोवली. त्यामुळेच शिवरायांनी स्वराज्याची स्थापना करून जनतेला सुरक्षित आणि सन्मानाचे जीवन दिले. शिक्षणासोबतच चारित्र्य घडविणे हे विद्यालयाचे कर्तव्य आहे. शिवरायांचे विचार आत्मसात करून प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्या आयुष्यात यशाचे शिखर गाठावे, हेच ध्येय घेऊन वाटचाल करण्याचे त्यांनी आवाहन केले.

विज्ञानविश्वाची माहितीपूर्ण रंजक सफर

# विज्ञानवार्ता

## पर्वतांमध्ये दडलेत ४२ टाईम बॉम्ब!



भारताचा शेजारील देश असलेल्या नेपाळच्या उंच पर्वतांमध्ये दडलेले ४२ हिमनदी तलाव (ग्लेशियल लेक) आता अत्यंत धोकादायक श्रेणीत पोहोचले आहेत. हे विशाल तलाव कोणत्याही क्षणी फुटू शकतात आणि जर असे झाले, तर खाली असलेली संपूर्ण दरी काही मिनिटांतच विनाशकारी पूर आणि चिखलाच्या ढिगाऱ्यात बदलू शकते, असा गंभीर इशारा तज्ज्ञांनी दिला आहे. या धोक्याला वैज्ञानिक आता 'टाईम बॉम्ब' म्हणत आहेत.

**सर्वात मोठा धोका कोशी प्रांतात धोकाग्रस्त क्षेत्र :** इंटरनॅशनल सेंटर फॉर इंटिग्रेटेड माऊंटेन डेव्हलपमेंटच्या (आयसीआयएमओडी) अहवालानुसार, नेपाळमधील एकूण २,०६९ हिमनदी तलावांपैकी धोक्याच्या यादीतील हे सर्व ४२ तलाव कोसी प्रांतामध्ये आहेत. संखुवासभा जिल्ह्यातील लोअर बरुण परिसरातील तल्लोपोखरी हिमनदी तलाव सर्वात धोकादायक मानला जात आहे. हा तलाव सुमारे तीन किलोमीटर लांब आणि जवळपास २०६ मीटर खोल आहे. संखुवासभा जिल्ह्यातील भोटखोला आणि मकालु या भागांमधील तलावांनाही जास्त धोका आहे.आयसीआयएमओडीने नेपाळच्या उत्तरेकडील भागांसाठी तिबेटमध्ये उगम पावलेल्या १३ हिमनदी तलावांचा संयुक्त धोका देखील गंभीर असल्याचे म्हटले आहे.

**विनाशकारी परिणाम : मृतदेह शोधणेही होईल कठीण :** जर या हिमनदी तलावांपैकी एक जरी फुटला, तर खालच्या भागात असलेल्या अरुण नदीच्या खोऱ्यातील (अरुण व्हॅली) गावे, रस्ते, पूल आणि इतर पायाभूत सुविधा अक्षरशः वाहून जातील. या महापुरात (ग्लेशियल लेक आऊटबर्स्ट फ्लड : जीएलओएफ ) मालमत्तेच्या नुकसानी व्यतिरिक्त, वाहून गेलेल्या लोकांचे मृतदेह शोधणे देखील अशक्य होईल, इतका हा धोका विशाल आहे, असा इशारा आयसीआयएमओडीने दिला आहे. या संवेदनशील हिमनदी तलावांवर थोडासाही भूकंप, अतिवृष्टी किंवा हिमनदी तुटण्याचा (ग्लेशियर ब्रेकिंग) परिणाम अत्यंत विनाशकारी ठरू शकतो. सध्या, जलविज्ञान आणि हवामानशास्त्र विभाग आणि यूएनडीपी नेपाळ यांच्या सहकार्याने या चार उच्च-धोका असलेल्या तलावांसाठी आपत्कालीन उपाययोजनांवर काम करत आहेत.

## दुधापासून कपडेनिर्मिती






दुधाला फाटल्यानंतर तुम्ही खराब म्हणून फेकून देत असता त्यापासून डिझायनर साडी, कुर्ते आणि फॅशनेबल आऊटफिट तयार केले जात असतात. ऐकायला हे विचित्र वाटले; परंतु दुधापासून कपडे तयार करण्याची इंडस्ट्री सध्या चर्चेत आहे. या कपड्यांना 'मिल्क फॅब्रिक' म्हणतात. हे एक असे कापड आहे जे दिसायला रेशमासारखे मुलायम आणि परिधान करण्यासाठी खूपच आरामदायी असते. दुधापासून तयार होणारे कपडे हे आता थंडीपासूनही बचाव करत आहेत.

एक लिटर दुधापासून सिर्फ १० ग्रॅम मिल्क फायबर बनते. म्हणजे साधारण एक टी-शर्ट तयार करण्यासाठी ६०-७० लिटर दुधाची गरज लागते. त्यामुळेच हे फॅब्रिक खूपच महाग आहे आणि केवळ प्रिमियम ब्रँडस् याचा वापर करू शकत आहेत. यामुळे मार्केटमध्ये मिल्क फॅब्रिकची किंमत गगनाला भिडलेली आहे. १ मीटर फॅब्रिकची किंमत सुमारे १५,००० ते ४५,००० रुपयांपर्यंत आहे. त्यामुळे अशी एक साडी घ्यायची झाली तर ३ ते ५ लाख रुपयांचा खर्च येतो. लोक आता प्लास्टिक पासून तयार झालेले पॉलिस्टर सोडून असे फॅब्रिक निवडत आहेत, जे निसर्गाचे नुकसान न होता तयार होत आहे. याच विचारातून मिल्क फॅब्रिकचा जन्म झाला. याचे पूर्ण श्रेय जर्मनीच्या एका इनोव्हेटीव्ह कंपनी 'क्यूमिल्क' ला जाते. 'क्यूमिल्क' हा साधा ब्रँड नाही. ही कंपनी ताजे दूध न वापरता इंडस्ट्रीयल वेस्ट मिल्कचा वापर करते. जे दूध खराब होते त्याला लाखोच्या टनात फेकून दिले जाते.

एकट्या युरोपात सुमारे २० लाख टन दूध दरवर्षी खराब होते. आणि या खराब दुधाला 'क्यूमिल्क' कंपनी अमूल्य फॅब्रिकमध्ये रूपांतरित करते. दुधापासून कापड कसे तयार होते, हे जाणून घेऊया. सर्वात आधी दूध नासवले जाते. म्हणजे दुधाला असे प्रोसेस केले जाते की, त्यात ठोस भाग (कर्ड) वेगळा होईल. कर्डपासून केसिन प्रोटिन काढले जाते. हेच प्रोटिन पुढे फॅब्रिकचा बेस बनते. केसिनला पाण्यात विरघळून लिक्विड तयार केले जाते. त्यामुळे ते मशिनमध्ये सहज प्रोसेस होऊ शकेल. या लिक्विडला स्पिनिंग मशिन तंतूत त्याचे रूपांतर करते. मशिन रेशमासारखे त्याचे पातळ तंतू तयार करते. तयार तंतूना धाग्यासारखे स्पिन केले जाते. यातून फायबर खूपच मुलायम आणि चमकदार होतात. यानंतर धाग्यांना विणून कापड तयार केले जाते. ही संपूर्ण प्रोसेस रसायनाशिवाय होते. त्यामुळे हे फॅब्रिक १०० टक्के बायोडिग्रेडेबल, स्कीन फ्रेंडली आणि इको फ्रेंडली असते.

दुधापासून कपडे बनवण्याचा इतिहास खूप जुना आहे. इटलीत १९३० मध्ये दुसऱ्या जागतिक युद्धाच्या वेळी लोकरीचा तुटवडा झाला होता. तेव्हा इटलीच्या संशोधकानी दुधाच्या प्रोटिनपासून धागा तयार केला. ज्याचे नाव लानिटाल ठेवले. लाना म्हणजे लोकर आणि इटलीतून तयार केले म्हणून लानिटाल. मुसोलिनी सरकारमध्ये हे फॅब्रिक खूप लोकप्रिय झाले; परंतु युद्ध संपल्यानंतर स्वस्त लोकर आणि सिंथेटिक फॅब्रिक मार्केटमध्ये आल्याने लानिटाल हळूहळू कमी झाले. आता नव्वद वर्षांनंतर पुन्हा २०२५ मध्ये या टेक्नॉलॉजी ग्रँडचे पुनरागमन झाले आहे. यावेळी फॅशनच्या जगात हे मोठा बदल घडवेल, असे म्हटले जात आहे. हे दुधाचे कापड रेशमापेक्षा ३ पट जास्त मुलायम असते. ॲन्टी-बॅक्टीरियल असल्याने घामाची दुर्गंधी येत नाही. थर्मल-रेग्युलेटेड म्हणजे थंडीत उष्ण आणि उकाड्यात थंड राहते. ॲलर्जी-फ्री असल्याने संवेदनशील त्वचेच्या लोकांना हा नवा पर्याय उपलब्ध झाला आहे.

## एआय जनरेटेड प्रतिमांचा होणार पर्दाफाश




सध्याच्या वेगवान तंत्रज्ञानाच्या जगात, एखादी प्रतिमा एआयद्वारे तयार केली आहे की, संपादित केली आहे, हे ओळखणे खूप कठीण झाले आहे. डिजिटल सामग्रीच्या मूळ स्रोताबाबत वाढत्या चिंता दूर करण्यासाठी, 'गुगल' ने आता जेमिनी ॲपमध्ये एक नवीन फीचर सादर केले आहे, जे वापरकर्त्यांना कोणतीही प्रतिमा 'गुगल'च्या एआय टूलचा वापर करून तयार किंवा संपादित केली आहे की नाही, हे त्वरित तपासण्याची सुविधा देते.

कंपनीने आपले नवीन जेमिनी ३-पॉवर्ड नॅनो बनाना प्रो मॉडेल सादर करतानाच हे नवीन फीचर जारी केले आहे, ज्यामुळे एआय-जनरेटेड सामग्रीच्या पारदर्शकतेच्या दिशेने आणखी एक महत्त्वाचे पाऊल टाकले गेले आहे. या फीचरच्या प्रारंभिक टप्प्यात, केवळ प्रतिमांवर लक्ष केंद्रित केले आहे आणि यासाठी 'गुगल'च्या डूपींहखऊ या अदृश्य एआय वॉटरमार्किंग तंत्रज्ञानाचा वापर केला जात आहे. लवकरच व्हिडीओ आणि ऑडिओच्या तपासणीची सुविधा जोडली जाईल, असे 'गुगल' ने स्पष्ट केले आहे.

हे फीचर जेमिनी ॲपव्यतिरिक्त 'गुगल' सर्च सारख्या प्लॅटफफॉर्मवर देखील विस्तारले जाईल. भविष्यात, डिजिटल सामग्रीची पडताळणी करण्यासाठी एक उद्योग-व्यापी मानक असलेल्या उ२ झअ कंटेंट क्रेडेंशियल्सचे सपोर्ट देखील जोडले जाणार आहे. 'गुगल' ची नवीन ओळख प्रणाली डूपींहखऊ नावाच्या अदृश्य डिजिटल वॉटरमार्किंग तंत्रज्ञानाद्वारे कार्य करते : जेव्हा 'गुगल'चे एआय कोणतीही प्रतिमा तयार करते, तेव्हा SynthID त्या प्रतिमेमध्ये शांतपणे छुपे मार्कर जोडते. हे मार्कर प्रतिमेच्या स्वरूपात कोणताही बदल करत नाहीत आणि वापरकर्त्याला ते अजिबात दिसत नाहीत.

मात्र, 'गुगल'चे जेमिनी ॲप हे मार्कर वाचू शकते आणि ती प्रतिमा 'गुगल'च्या 'एआय'चा वापर करून बनवली किंवा संपादित केली आहे की नाही, हे निश्चित करू शकते. जेमिनी केवळ 'गुगल' च्या स्वतःच्या साधनांनी तयार केलेल्या किंवा सुधारित केलेल्या प्रतिमांचीच पडताळणी करू शकते. जर एखादी प्रतिमा दुसऱ्या कंपनीच्या एआय मॉडेलमधून किंवा स्वतंत्र विकासकाकडून आली असेल, तर जेमिनी तिचा स्रोत निश्चित करू शकणार नाही. तरीही, हे फीचर मोठ्या प्रमाणावर ऑनलाईन सामग्रीसाठी उपयुक्त ठरणार आहे.

## नऊ तास खुर्चीत बसताय?



दिवसभर डेस्क जॉब करणाऱ्या लोकांसाठी एक आरोग्यविषयक महत्त्वाचा इशारा डॉक्टरांनी दिला आहे. रक्तवाहिन्यांचे सर्जन तज्ज्ञांच्या मते, जर तुम्ही दिवसातील ९ तास खुर्चीवर बसून असाल, तर सायंकाळी १०,००० पावले चालूनही तुमच्या रक्तवाहिन्यांचे (व्हेन्स) झालेले नुकसान भरून काढता येत नाही. रक्ताभिसरण (ब्लड सर्क्युलेशन) हे तुम्ही एकूण किती पावले चालता यावर अवलंबून नसून, तुम्ही किती वारंवार हालचाल करता, यावर अवलंबून असते.

**जास्त वेळ बसून राहण्याचे रक्तवाहिन्यांवरील गंभीर परिणाम**

गुरुत्वाकर्षणामुळे (ग्रॅव्हिटी) रक्तहृदयाकडे परत ढकलण्यासाठी पायांच्या रक्तवाहिन्यांना खूप मेहनत घ्यावी लागते. पायातील पिंडरीचे स्नायू (क्लार्फ मसल्स), ज्यांना शरीराचे दुसरे हृदय देखील म्हणतात, ते आकुंचन पावून रक्तवरच्या दिशेने ढकलतात.

जेव्हा एखादी व्यक्ती जास्त वेळ न हलता बसून राहते, तेव्हा रक्त साचून राहते. पिंडरीचे स्नायू निष्क्रिय राहिल्याने पायांमध्ये रक्तप्रवाह मंदावतो आणि रक्त साचू लागते. पायातील शिरांमध्ये दबाव वाढतो. वाढलेल्या दाबामुळे रक्तवाहिन्यांच्या आतील झडपा कमकुवत होतात किंवा खराब होतात. या झडपा रक्ताला मागे जाण्यापासून रोखतात. परिणामी सूज येणे, जडपणा जाणवणे, व्हेरिकोज व्हेन्स तयार होणे आणि कालांतराने रक्ताच्या गाठी (ब्लड क्लॉटस) होण्याचा धोका वाढतो. तज्ज्ञांच्या मते, तुम्ही संध्याकाळी जरी जास्त चाललात, तरी दिवसभर न हलता बसून राहिल्यामुळे झालेल्या रक्ताच्या या स्थिरतेला (इमोबॅलिटी) तुम्ही पूर्ववत करू शकत नाही.

पाऊल संख्येपेक्षा सातत्य महत्त्वाचे

रक्तवाहिन्यांचे आरोग्य जपण्यासाठी जास्त चालण्यापेक्षा वारंवार आणि नियमित हालचाल सातत्याने करणे महत्त्वाचे आहे. तज्ज्ञांनी यासाठी साधे नियम सांगितले आहेत. प्रत्येक ४५ ते ६० मिनिटांनी उठा. थोडे ताणून (स्ट्रेच) घ्या किंवा कमीत कमी दोन मिनिटे चाला. पिंडरीच्या स्नायूंना सक्रिय करा, खुर्चीवर बसल्या बसल्या देखील घोट्याचे स्नायू फिरवा किंवा टाचांवर उभे राहण्याचा व्यायाम करा. या छोट्या हालचालीमुळे दुसरे हृदय असलेले पिंडरीचे स्नायू सक्रिय होतात आणि रक्त पंप करायला मदत करतात.

लहान आणि सातत्यपूर्ण हालचालींच्या विश्रांतीमुळे सूज, जडपणा आणि गंभीर रक्तवाहिन्यासंबंधी समस्या टाळता येतात. त्यामुळे हे डेस्क एक्ससरसाईज महत्त्वाचे आहेत.


## आढळला दात असलेला देवमासा




जगातील दुर्मीळ मानल्या जाणाऱ्या जिन्कगो-टूथेड बीक्ड व्हेल या सुळे अर्थात दात असलेल्या देवमाशाचा शोध संशोधकांनी लावला आहे. उत्तर पॅसिफिक महासागरात प्रथमच हा जिवंत देवमासा पहिल्यांदाच आढळला आहे. अनेक वर्षांच्या शोधानंतर, उत्तर पॅसिफिक महासागरात आढळणाऱ्या एका विचित्र प्रतिध्वनी निर्मितीचे रहस्यही या माशाच्या शोधाने उलगडले आहे. धनुष्यबाणाने घेतला डीएनए नमुना या दुर्मीळ प्रजातीच्या देवमाशाचा अभ्यास करण्यासाठी आणि तो अधिकृतपणे ओळखण्यासाठी, संशोधकांनी एका किशोरवयीन देवमाशाचा डीएनए नमुना घेण्यासाठी क्रॉसबो (धनुष्यबाणासारख्या उपकरणाचा)चा वापर केला.

या क्रॉसबाने देवमाशाला इजा न पोहोचवता त्याच्या त्वचेचा एक लहानसा तुकडा गोळा करण्यात आला. हा शोध अत्यंत महत्त्वाचा आहे. कारण, यापूर्वी या देवमाशाचे अस्तित्व केवळ किनाऱ्यांवर सापडलेल्या मृत शरीरांवरून किंवा अस्थींवरूनच ज्ञात होते. ते इतके दुर्मीळ आहेत की, वैज्ञानिक त्यांना जिवंत पाहण्यासाठी अनेक वर्षांपासून प्रयत्न करत होते. या देवमाशांकडून उत्सर्जित होणाऱ्या विशिष्ट इकोलोकेशन पल्स (पाण्यात दिशा आणि शिकार शोधण्यासाठी वापरले जाणारे ध्वनी) चे गूढ आता या शोधानंतर उलगडले आहे. संशोधकांना आता या गूढ समुद्री जीवाच्या जीवनशैलीबद्दल, स्थलांतर मार्गांबद्दल आणि लोकसंख्येच्या स्थितीबद्दल अधिक माहिती मिळण्याची आशा आहे.

## मृत्यूला चकवा देणारी यंत्रणा





जगातील अनेक प्राणी त्यांच्या भक्षकांच्या हल्ल्यापासून किंवा प्रतिस्पर्धकांपासून वाचण्यासाठी विषारी रसायने (टॉक्सिन्स) तयार करतात किंवा अन्नातून मिळवून साठवतात. अशा जीवघेण्या विषारी पदार्थांना तोंड देण्यासाठी, इतर प्राण्यांनी उत्क्रांतीच्या माध्यमातून अनेक संरक्षण यंत्रणा चतुराईने विकसित केल्या आहेत, ज्यामुळे ते विषारी अन्न खाऊनही मृत्यूला चकवा देतात.

**विष-प्रतिबंधाचे (अँटिटॉक्सिन) प्रमुख मार्ग**

विषारी भक्ष्य खाल्ल्यानंतरही प्राणी जिवंत राहण्यासाठी मुख्यतः तीन प्रकारच्या युक्त्या वापरतात.

**१. लक्ष्य प्रथिनांमध्ये बदल (अल्टरेड टार्गेट प्रोटिन्स) :** यामध्ये विषाचा परिणाम शरीरातील ज्या महत्त्वाच्या प्रथिनांवर (प्रोटिन्स) होतो, जसे की सोडियम-पोटॅशियम पंप, त्या प्रथिनांमध्ये प्राणी जनुकीय बदल (जेनरिक म्युटेशन) करतात. यामुळे विषारी रेणू (टॉक्सिक मोलेक्युल्स) त्या प्रथिनांना बांधू शकत नाही, परिणामी पेशींची (सेल्स) कार्यप्रणाली सुरळीत राहते. विषारी मिल्कवीड वनस्पती खाणा?या मोनार्क फुलपाखराच्या अळीमध्ये (सुरवंट) असे बदल झालेले संशोधातून पुढे आले आहे

**२. विष काढून टाकणे किंवा निष्प्रभ करणे :** काही प्राणी त्यांच्या पेशींच्या आवरणांमध्ये एबीसीबी ट्रान्सपोर्टर नावाचे प्रथिने विकसित करतात. ही प्रथिने विषारी पदार्थ शरीरात शोषले जाण्यापूर्वीच आतड्यांतून किंवा मज्जातंतूंच्या जवळून बाहेर टाकतात. काही साप किंवा गिलहरी यांच्या यकृत/रक्तामध्ये असे एंझाइम्स किंवा प्रथिने आढळतात, जे विषाचे रूपांतर बिनविषारी स्वरूपात करतात. (उदा. मानवी शरीर अल्कोहोल किंवा निकोटीनसोबत करते.) अमेरिकेतील कॅलिफोर्निया ग्राऊंड गिलहरीच्या रक्तात साप विषरोधक प्रथिने असतात, जी रॅटलस्नेकच्या विषाला निष्प्रभ करतात.

**३. वर्तणुकीतून विष टाळणे :** अनेक प्राणी विषारी भक्ष्य पूर्णपणे खाण्याऐवजी त्यांच्या शरीराचे विष नसलेले भाग खाणे निवडतात. उदाहरणार्थ : काही साप पोयझन डार्ट फ्रॉग गिळण्यापूर्वी त्यांना जमिनीवर घासून त्यांच्या त्वचेवरील विषारी लेप कमी करण्याचा प्रयत्न करतात. तसेच, मोनार्क अळ्या मिल्कवीडमधील विषारी द्रव बाहेर काढण्यासाठी पानांच्या शिरा कापतात. विषाचा वापर आत्मसंरक्षणासाठी काही प्राणी (उदा. इरिडेसेंट डॉगबेन बीटल आणि मोनार्क फुलपाखरे) जे विष अन्नातून मिळवतात, ते नष्ट न करता ते आपल्या शरीरात सुरक्षितपणे साठवतात. नंतर तेच विष ते स्वतःचे संरक्षण कवच म्हणून भक्षकांविरुद्ध वापरतात. त्यांच्या चमकदार रंगांमुळे ते, मी विषारी आहे, असा इशाराच भक्षकांना देतात.

## झुडपाचे उष्मा सहन करण्याचे गुपित



पृथ्वीवरील सर्वात उष्ण ठिकाणांपैकी एक असलेल्या ठिकाणी, एक अनोखी वाळवंटी वनस्पती कशी तग धरू शकते, याचा शोध शास्त्रज्ञांनी लावला आहे. तापमान वाढल्यावर ही वनस्पती आपल्या अंतर्गत रचनांमध्ये बदल करते, असे दिसून आले आहे. कॅलिफोर्नियातील डेथ व्हॅलीमध्ये वारंवार अत्यंत टोकाची परिस्थिती अनुभवायला मिळते. उन्हाळ्यातील तापमान सावलीतही अनेकदा ४९ अंश सेल्सिअसपेक्षा जास्त वाढते. इतक्या उष्णतेमुळे बहुतेक वनस्पती कोमेजून जातात; परंतु 'टाइडस्ट्रोमिया ऑब्लोंगीफोलिया' ही वनस्पती मात्र या उष्णतेतही जोमाने वाढते.

आता संशोधकांना असे आढळून आले आहे की, ही राखाडी-हिरवी फुले येणारी झुडपे अति-उष्ण परिस्थितीत भरभराट होण्यासाठी लहान पाने वाढवतात आणि त्यांच्या अंतर्गत रचनांमध्ये फेरबदल करतात. त्यांना हे देखील आढळले आहे की, या झुडपामध्ये सर्वात जास्त प्रकाशसंश्लेषी उष्णता सहनशीलता आहे, म्हणजेच, ज्ञात असलेल्या कोणत्याही वनस्पतीपेक्षा उच्च तापमानावर प्रकाशसंश्लेषण करण्याची क्षमता यात आहे. हे संशोधन १७ नोव्हेंबर रोजी 'करंट बायोलॉजी' जर्नलमध्ये प्रकाशित झाले. जागतिक तापमानवाढीमुळे तापमान वाढत आहे आणि उष्णतेच्या लाटांची वारंवारता वाढत आहे. या उष्णतेमुळे गहू आणि मका यांसारख्या मुख्य अन्नधान्यांचे उत्पादन आधीच कमी होत आहे. तापमान वाढत असताना अन्नसुरक्षेवर याचा काय परिणाम होईल, याबद्दल शास्त्रज्ञ आणि अधिकारी चिंतित आहेत.

T. oblongifolia सारख्या उष्णता-प्रेमी वनस्पतींमध्ये, इतर पिकांना उष्णतेत तग धरण्यास मदत करण्यासाठी आणि लोकांच्या ताटात अन्न ठेवण्यासाठी रहस्ये दडलेली असू शकतात. मिशिगन स्टेट युनिव्हर्सिटीच्या प्लांट रेझिलिअन्स इन्स्टिट्यूटचे संचालक आणि वनस्पती जीवशास्त्रज्ञ, तसेच अभ्यासाचे सह-लेखक सेउंग ऱ्ही यांनी सांगितले की, 'त्यांचे अनुकूलन समजून घेतल्यास, वाढत्या वारंवारतेने आणि दीर्घकाळ टिकणाऱ्या उच्च तापमानाखाली वाढ सुधारण्यासाठी संशोधकांना पिके, वातावरण आणि व्यवस्थापन धोरणे तयार करण्यात मदत होऊ शकते. T. oblongifolia मध्ये काहीतरी खास आहे, हे शास्त्रज्ञांना अनेक दशकांपासून माहीत आहे. उच्च तापमानात, बहुतेक वनस्पतींच्या प्रकाशसंश्लेषणाचा दर कमी होतो; परंतु १९७२ मध्ये, संशोधकांनी दाखवून दिले होते की T. oblongifolia चे प्रकाशसंश्लेषण ११७ F (47 C) तापमानाला सर्वोच्च पातळीवर (Peaked) पोहोचते. ही वनस्पती इतर वनस्पती कोमेजून जात असतानाही प्रकाशसंश्लेषण आणि भरभराट कशी करू शकते हे शोधण्यासाठी, नवीन अभ्यासामागील संशोधकांनी डेथ व्हॅलीमधून बिया गोळा केल्या आणि वाढीच्या कंटेनरमध्ये त्या वनस्पती वाढवल्या.

वनस्पती आठ आठवड्यांच्या झाल्यावर, शास्त्रज्ञांनी त्यांना एक महिन्यासाठी डेथ व्हॅलीच्या परिस्थितीत ठेवले. त्यानंतर त्यांनी वनस्पतींच्या प्रतिसादांचे निरीक्षण केले, जसे की त्यांनी किती कार्बन डायऑक्साईड शोषला. केवळ दोन दिवसांच्या आत, T. oblongifolia ने तिच्या प्रकाशसंश्लेषणाचा दर वाढवला. दहा दिवसांनंतर, तिने कमी तापमानावर तयार केलेल्या पानांपेक्षा लहान असलेल्या पानांच्या विपुलतेमुळे तिचे वस्तुमान तिप्पट केले; पण खरा आश्चर्यकारक बदल वनस्पतीमध्ये आत झाला. शास्त्रज्ञांना आढळले की, तिने अधिक मायटोकॉँड्रिया विकसित केले, जे पेशींमधील ऊर्जा केंद्रे किंवा बॅटरी असतात. हे मायटोकॉँड्रिया देखील अधिक गतिशील होते आणि प्रकाशसंश्लेषणाच्या ठिकाणांच्या जवळ जाण्यास सक्षम होते, जे क्लोरोप्लास्टस् नावाच्या विशेष अंगकांमध्ये होते.

# शिक्षण वाचविण्यासाठी एकमताने ठराव

**राज्यव्यापी आंदोलन करणार**



नगर - रविंद्र नाट्यमंदिर प्रभादेवी मुंबई येथे पार पडलेल्या शिक्षक संमेलनात शेकडो शिक्षक-शिक्षकेतरांच्या उपस्थित मुंबईतील संस्था, संस्थाचालक, मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा शिक्षणक्षेत्रातील कार्याबद्दल माजी शिक्षक आमदार कपिल पाटील आणि शिक्षक भारतीचे अध्यक्ष अशोक बेलसरे यांच्या हस्ते सावित्री फातिमा पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. ८वा वेतन आयोग तत्काळ लागू करा, अन्यायकारक टीईटी सक्ती रद्द करा, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना अतिरिक्त करणारा संचमान्यतेचा जीआर रद्द करा, विषयाला शिक्षक द्या, अशैक्षणिक कामातून शिक्षकांना मुक्त करा, शिक्षकांना शिकवू द्या, पेन्शनचा हक्क अबाधित ठेवा, रिक्त पदे त्वरित भरा या आणि इतर मागण्यांसाठी राज्य सरकारी, निमसरकारी शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी समन्वय समितीच्या नेतृत्वाखाली एप्रिल महिन्यात राज्यव्यापी आंदोलन करण्याची घोषणा शिक्षक भारतीचे कार्याध्यक्ष सुभाष मोरे यांनी केली. राज्यव्यापी आंदोलनात हा ठराव एकमताने मंजूर करण्यात आल्याची माहिती शिक्षक भारतीचे राज्य सचिव सुनील गाडगे यांनी दिली.

एकदिवसीय लाक्षणिक संपाला शिक्षक भारती संघटनेने पाठींबा दिला होता. दहावी, बारावीच्या परीक्षा संपल्यानंतर समन्वय समितीच्या माध्यमातून राज्यव्यापी आंदोलनाचे नियोजन करण्यात येणार आहे. या कार्यक्रमात माजी आमदार कपिल पाटील यांनी कंत्राटीकरण आणि खाजगीकरणामुळे कामगार व शिक्षक-शिक्षकेतरांचे शोषण वाढल्याचे सांगितले रिक्त पदांची भरती त्वरित व्हावी तसेच सर्व नागरिकांना सार्वजनिक वाहतूक व्यवस्था मोफत करावी, यासाठी राज्याचे मुख्यमंत्र्यांची भेट घेणार असल्याचे कपिल पाटील यांनी यावेळी सांगितले.

शिक्षक भारती संघटनेचे अध्यक्ष अशोक बेलसरे यांनी संस्थाचालक व मुख्याध्यापक यांनी एकत्रितपणे शिक्षक-शिक्षकेतर कर्मचा-यांच्या आंदोलनाला पाठींबा द्यावा, असे आवाहन केले.

सुनील गाडगे यांच्यासह जिल्हाध्यक्ष तथा माध्यमिक शिक्षक सोसायटीचे संचालक आप्पासाहेब जगताप, पुणे विभागीय कार्याध्यक्ष महेश पाडेकर, जिल्हा सचिव विजय कराळे, विजय लंके, आनंद झरेकर, संजय पवार, महिला जिल्हाध्यक्ष आशा मगर, कार्यवाह संजय भुसारी, कैलास जाधव, नवनाथ घोरपडे, उच्च माध्यमिक जिल्हाध्यक्ष रामराव काळे, संभाजी पवार, हनुमंत रायकर, सिकंदर शेख, संतोष देशमुख, किसन सोनवने, संतोष शेंदुरकर, संभाजी चौधरी, श्रीकांत गाडगे, विभावरी रोकडे, मीनाक्षी सूर्यवंशी, रोहिणी भोर, शकुंतला वाळुज, छाया लष्करे, जया गागरे, अनघा सासवडकर, रूपाली बोरुडे, सोनाली अकोलकर तसेच विनाअनुदानित शाळांचे राज्याध्यक्षा रूपाली कुरूमकर आदी पदाधिकाऱ्यांनी माहिती दिली.

# दुर्बल घटकांना आरोग्यसेवेसाठी आनंदऋषीजी हॉस्पिटलचा आधार

**महापौर ज्योतीताई गाडे यांचे प्रतिपादन, मेंदू विकार मोफत तपासणी शिबिराला प्रतिसाद, ६० रुग्णांनी घेतला लाभ; मेंदू विकारावर अल्पदरात अत्याधुनिक सुविधा उपलब्ध**



जैन सोशल फेडरेशन संचालित आनंदऋषीजी हॉस्पिटल अ‍ॅण्ड मेडिकल रिसर्च सेंटर येथे आयोजित करण्यात आलेल्या मेंदू विकार मोफत तपासणी शिबिराचे उद्घाटन महापौर ज्योतीताई गाडे यांच्या हस्ते करण्यात आले.

नगर - आनंदऋषीजी हॉस्पिटल हे दुर्बल व सर्वसामान्य घटकांसाठी आरोग्यसेवेचा आधार बनला असून, जिल्ह्यासह राज्यातील विविध भागांतून नागरिक उपचारासाठी येथे येत आहेत. आरोग्यसेवेचे व्रत जपत रुग्णांना दर्जेदार सुविधा उपलब्ध करून देण्याचे कार्य या हॉस्पिटलमधून सातत्याने केले जात असल्याची भावना महापौर ज्योतीताई गाडे यांनी व्यक्त केली.

जैन सोशल फेडरेशन संचालित आनंदऋषीजी हॉस्पिटल अ‍ॅण्ड मेडिकल रिसर्च सेंटर येथे आयोजित करण्यात आलेल्या मेंदू विकार मोफत तपासणी शिबिराचे उद्घाटन महापौर ज्योतीताई गाडे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते बोलत होत्या. याप्रसंगी जैन सोशल फेडरेशनचे संतोष बोथरा, डॉ. प्रकाश कांकरिया, डॉ. सुधा कांकरिया, डॉ. वसंत कटारिया, प्रकाश छल्लाणी, सीए आयपी अजय मुथा, अभय गुगळे, माणकचंद कटारिया, वसंत चोपडा, डॉ. आशिष भंडारी, न्यूरोलॉजिस्ट डॉ. अद्वैत गीते तसेच लहान मुलांचे मेंदू विकार तज्ज्ञ डॉ. स्नेहा म्हस्के आदी उपस्थित होते.

महापौर गाडे पुढे म्हणाल्या की, न्यूरोलॉजिस्ट डॉक्टरांची संख्या कमी असून मेंदू विकारांवरील उपचार अत्यंत खर्चिक असतात. सध्याच्या महागाईच्या काळात सर्वसामान्य नागरिकांना हा खर्च पेलवणे कठीण जाते. पैशाअभावी रुग्णांची होणारी हेळसांड थांबवून त्यांना योग्य वेळी दर्जेदार उपचार मिळणे अत्यावश्यक आहे. आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये अशा रुग्णांना परवडणाऱ्या दरात सेवा देत आहे. गोरगरिबांपर्यंत आरोग्यसेवा पोहोचविणाऱ्या या कार्यासाठी महापालिकेच्या माध्यमातूनही सहकार्य केले जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

डॉ. अद्वैत गीते यांनी मेंदू विकारांशी संबंधित विविध तपासण्या अल्पदरात उपलब्ध करून दिल्या जात असल्याची माहिती दिली. हॉस्पिटलमध्ये अत्याधुनिक वैद्यकीय सुविधा उपलब्ध असून रुग्णांना सर्वसमावेशक उपचार दिले जात असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

डॉ. स्नेहा म्हस्के म्हणाल्या की, लहान मुलांमध्ये मेंदू विकार आढळल्यास पालक गोंधळून जातात. मुलाला नेमकी काय समस्या आहे हे समजणे कठीण जाते. अशा वेळी तज्ज्ञ डॉक्टरांचे योग्य निदान आणि वेळेवर उपचार अत्यंत आवश्यक असतात. चालण्यात अडचण, फिट येणे, मतिमंदता, गतिमंदता, आकलन क्षमतेत घट, तोल जाणे अशा विविध समस्यांवर प्रभावी उपचार उपलब्ध असल्याचे त्यांनी सांगितले.

या मेंदू विकार मोफत तपासणी शिबिरात डोकेदुखी, मायग्रेन, फिट, हात-पायाला मुंग्या येणे, अपस्मार, नसांवरील सूज, चक्कर येणे, अर्धांगवायू, पॅरालिसिस आदी आजारांवर तपासणी करण्यात आली. एकूण ६० रुग्णांनी या शिबिराचा लाभ घेतला. तसेच मेंदू विकारांशी संबंधित विविध तपासण्या शिबिरार्थींना अल्पदरात उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या.

महापौर ज्योतीताई गाडे यांचा हॉस्पिटलच्या वतीने उपस्थितांनी सत्कार केला. सूत्रसंचालन डॉ. आशिष भंडारी यांनी केले. प्रकाश छल्लाणी यांनी आभार मानले.

# जिल्हा माध्यमिक शिक्षक संघटनांचे एकत्रीकरण

**दोन्ही संघटना आल्या एकत्र; जुनी पेन्शन, टीईटी धोरणाविरोधात संयुक्त लढ्याचा निर्धार**



जिल्हा माध्यमिक शिक्षक संघटनांचे एकत्रीकरणप्रसंगी उपस्थित असलेले दोन्ही शिक्षक संघटनांचे पदाधिकारी.

नगर - अहमदनगर जिल्हा माध्यमिक शिक्षक संघटनेची सहविचार सभा माध्यमिक शिक्षक भवन येथे उत्साहात पार पडली. या बैठकीत नगर जिल्ह्यातील दोन स्वतंत्रपणे कार्यरत असलेल्या माध्यमिक शिक्षक संघटनांचे एकत्रीकरण करण्याचा निर्णय घेण्यात आला. गेल्या काही वर्षांत जिल्हा माध्यमिक शिक्षक संघटना दोन गटांत विभागली गेली होती. त्यामुळे शिक्षकांचे विविध प्रश्न मांडताना व शासनदरबारी पाठपुरावा करताना अडचणी निर्माण होत होत्या. अनेक विषयांवर एकवाक्यता नसल्याने शिक्षकांच्या हितासाठी ठोस भूमिका घेणे कठीण जात होते. या पार्श्वभूमीवर दोन्ही संघटनांचे अध्यक्ष, सचिव व प्रमुख पदाधिकारी यांनी एकत्र येऊन संघटनात्मक एकजूट साधण्याचा निर्णय १९ फेब्रुवारी रोजी झालेल्या बैठकीत घेतला.

सभेला माजी अध्यक्ष चांगदेव कडू, माजी अध्यक्ष शिवाजीराव ढाळे, माजी अध्यक्ष राजेंद्र लांडे, संघटनेचे अध्यक्ष आप्पासाहेब शिंदे, शिरीष टेकाळे, रमजान हवालदार, राजेंद्र खेडकर तसेच प्रशांत होन, प्रवीण गायकवाड आदी उपस्थित होते. सर्व पदाधिकाऱ्यांनी मनमोकळ्या चर्चेतून शिक्षकांच्या भविष्यासाठी एकत्र येण्याची गरज अधोरेखित केली.

बैठकीत शिक्षकांच्या प्रलंबित प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. विशेषतः सर्व शिक्षकांना जुनी पेन्शन योजना लागू करावी, या मागणीसाठी एकत्रितपणे लढा उभारण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. तसेच शासनाने लागू केलेल्या टीईटी धोरणाबाबत संघटनेची भूमिका स्पष्ट करत त्याविरोधात ठोस भूमिका घेण्याचे ठरविण्यात आले.

याशिवाय शिक्षणाधिकारी कार्यालयातील प्रलंबित कामे, दप्तर दिरंगाई, सेवा विषयक अडचणी, वेतन व पदोन्नती संदर्भातील प्रश्न यावर सखोल चर्चा झाली. भविष्यात सर्व प्रश्नांवर एकत्रितपणे आणि संघटित पद्धतीने पाठपुरावा करण्याचा एकमताने निर्णय घेण्यात आला. सभेच्या शेवटी जिल्हा स्तरावर एकच सर्वसमावेशक कार्यकारणी स्थापन करण्याचे ठरविण्यात आले असून, येत्या एक महिन्याच्या आत नवीन जिल्हा कार्यकारणी जाहीर करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले. या एकत्रीकरणामुळे जिल्ह्यातील माध्यमिक शिक्षकांना अधिक बळ मिळणार असून, त्यांच्या हक्कांसाठी अधिक प्रभावीपणे आवाज उठवता येणार असल्याचा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.

# के. जी. कला व वाणिज्य महाविद्यालयामध्ये ऑनलाइन टॅरो सर्टिफिकेशन कोर्सची सुरुवात



अभिलाषा बाफना

नगर - के. जी. कला व वाणिज्य महाविद्यालयात टॅरो स्टडीज सर्टिफिकेट प्रोग्राम हा नवीन अ‍ॅड-ऑन अभ्यासक्रम ऑनलाइन पद्धतीने सुरू करण्यात येत आहे. टॅरोचे शास्त्रशुद्ध, संरचित व नैतिक अध्ययन करण्यासाठी हा कोर्स विशेषतः तयार करण्यात आला असून अभ्यासक्रमाचे माध्यम इंग्रजी राहणार आहे.

आध्यात्मिक शिक्षिका व टॅरो मार्गदर्शक सौ. अभिलाषा ऋषी बाफना यांच्या मार्गदर्शनाखाली हा ऑनलाइन कोर्स राबविण्यात येणार आहे. टॅरोला केवळ भविष्यकथन न मानता प्रतीकात्मक अध्ययन, आत्मजागरूकता आणि जबाबदार मार्गदर्शनाचे साधन म्हणून मांडण्यावर या अभ्यासक्रमात विशेष भर देण्यात येणार आहे.

या कोर्समध्ये टॅरोची मूलभूत रचना, प्रतीकांचे सखोल अध्ययन, विविध स्प्रेड तंत्र, नैतिक मूल्ये व व्यावसायिक आचारसंहिता यांचा समावेश असेल. अभ्यासक्रम यशस्वीरीत्या पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना के. जी. महाविद्यालयामार्फत प्रमाणपत्र प्रदान करण्यात येणार आहे.

हा अभ्यासक्रम महाविद्यालयीन विद्यार्थी, गृहिणी तसेच स्वतःचा व्यवसाय किंवा उत्पन्नाचे अतिरिक्त साधन निर्माण करू इच्छिणाऱ्या व्यक्तींसाठी उपयुक्त ठरणार आहे. कौशल्यविकास व स्व-रोजगाराच्या दृष्टीने ही एक महत्त्वपूर्ण संधी असल्याचे महाविद्यालयातर्फे सांगण्यात आले आहे.

प्रवेश प्रक्रिया सुरू असून इच्छुकांनी ९८५०१३६६५४ या क्रमांकावर संपर्क साधावा अथवा www.kgcollege.in या अधिकृत संकेतस्थळावर संबंधित अभ्यासक्रमासाठी ऑनलाइन नोंदणी करावी, असे आवाहन महाविद्यालयाच्या परिसर संचालिका डॉक्टर स्वाती मुनोत यांनी कळवले आहे.

# अय्यप्पा स्वामी मंदिरात्त २१ फेब्रुवारीला 'मुथप्पन वेल्लट्टम' विशेष पूजेचे आयोजन




नगर - केरळ राज्यातील उत्तर मालाबार भागाची एक समृद्ध परंपरा असणाऱ्या 'मुथप्पन वेल्लट्टम' पूजेचे आयोजन अहिल्यानगरमधील श्री अय्यप्पा स्वामी मंदिरात करण्यात आले आहे. २१ फेब्रुवारीला सायंकाळी ५:३० वाजता या विशेष पूजा होणार आहे. दरवर्षी 'मुथप्पन वेल्लट्टम' पूजा नगरच्या अय्यप्पा स्वामी मंदिरात उत्साहात व भक्तिभावाने केली जाते, अशी माहिती अय्यप्पा सेवा समितीचे अध्यक्ष बाबु टायरवाले यांनी दिली.

अधिक माहिती देताना उपाध्यक्ष राजू लक्ष्मण म्हणाले, 'मुथप्पन' हे भगवान शिवांचे स्वरूप मानले जाते. ही पूजा भक्तांचे दुःख कमी करणारी, आनंद आणि समृद्धी आणणारी आणि सांप्रदायिक सलोखा आणणारी आहे. हा उत्सव धार्मिक आणि सांस्कृतिक सौहार्दाचे एक अद्वितीय उदाहरण असून यामध्ये सर्व जाती धर्मांचे लोक सहभागी होतात. नगरमध्ये केरळ राज्याच्या पारंपारिक पद्धतीने या पूजेचे भक्तिपूर्ण वातावरणात आयोजन केले करण्यात आले आहे.

'मुथप्पन वेल्लट्टम' पूजा विधी नंतर भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे, नगरमधील सर्व नागरिकांनी या विशेष पूजेचा लाभ घ्यावा व मुथप्पन यांचे आशीर्वाद प्राप्त करावेत, असे आवाहन अय्यप्पा सेवा समितीचे सचिव वसंत सिंग, सहसचिव के. उदयकुमार व खजिनदार पी. सत्यान नायर यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

# शालार्थ मधील बीडीएस प्रणाली तात्काळ सुरू करा

**शिक्षक, शिक्षकेतरांची भविष्य निर्वाह निधीची रक्कम अडकली, शिक्षक परिषदेची शिक्षण आयुक्तांकडे निवेदनाद्वारे मागणी**



बाबासाहेब बोडखे

नगर - शालार्थ वेतन प्रणालीतील बीडीएस (बिल डिस्बर्समेंट सिस्टीम) व्यवस्था तात्काळ सुरू करून भविष्य निर्वाह निधी (पीएफ) खात्यावरील अंतिम परतावा तसेच अग्रिम रक्कम संबंधित शिक्षक व कर्मचाऱ्यांना त्वरीत वितरित करण्यात यावी, अशी मागणी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेच्या वतीने करण्यात आली आहे. या मागणीचे निवेदन शिक्षक परिषदेचे राज्य कार्याध्यक्ष तथा माजी शिक्षक आमदार नागो गाणार यांनी शिक्षण आयुक्तांना दिले असल्याची माहिती जिल्हाध्यक्ष बाबासाहेब बोडखे यांनी दिली.

शालार्थ वेतन प्रणालीतील बीडीएस व्यवस्था बंद असल्यामुळे सेवानिवृत्त झालेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना भविष्य निर्वाह निधी खात्यावरील अंतिम परतावा रक्कम गेल्या चार महिन्यांपासून मिळालेली नाही. परिणामी, निवृत्तीनंतरच्या विविध गरजांसाठी या रकमेवर अवलंबून असलेल्या अनेक शिक्षकांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे.

याचबरोबर कार्यरत शिक्षक व कर्मचाऱ्यांनाही भविष्य निर्वाह निधी खात्यातील परतावा अथवा ना-परतावा अग्रिम रक्कम मिळवणे दुरापास्त झाले आहे. वैद्यकीय उपचार, मुलांचे शिक्षण, घरबांधणी किंवा इतर अत्यावश्यक कारणांसाठी आवश्यक असलेली ही रक्कम वेळेत न मिळाल्याने शिक्षक वर्गात प्रचंड नाराजी निर्माण झाली आहे.

भविष्य निर्वाह निधी ही शिक्षक-कर्मचाऱ्यांच्या भविष्यासाठीची सुरक्षित तरतूद मानली जाते. आपल्या सेवाकाळात काटकसरीने साठवलेली ही रक्कम वेळेवर न मिळाल्यामुळे संबंधितांना मानसिक व आर्थिक त्रास सहन करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर बीडीएस प्रणाली तातडीने सुरू करणे अत्यावश्यक व निकडीचे असल्याचे शिक्षक परिषदेने स्पष्ट केले आहे.

## शासनाने तात्काळ निर्णय घ्यावा

सेवानिवृत्तीनंतर विविध कारणांसाठी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना मोठ्या प्रमाणात आर्थिक गरज भासते. भविष्यातील नियोजन लक्षात घेऊन ते भविष्य निर्वाह निधीच्या रकमेवर अवलंबून असतात. मात्र सध्या शालार्थमधील बीडीएस प्रणाली बंद असल्याने अनेकांना गंभीर अडचणींना सामोरे जावे लागत आहे. शासनाने तात्काळ बीडीएस प्रणाली सुरू करून भविष्य निर्वाह निधी खात्यावरील रक्कम संबंधितांना वितरित करावी, अशी मागणी बाबासाहेब बोडखे यांनी केली आहे.

# 'न्याय करत असलेला अन्याय'

विश्व सामाजिक न्याय दिवस हा २० फेब्रुवारीला दरवर्षी पाळण्यात यावा, असा ठराव संयुक्त राष्ट्र संघाकडून २६ नोव्हेंबर २००७ मध्ये केला गेला आणि २००९ पासून तो नियमित जगभर पाळण्यात येतो आहे, याचा मुख्य उद्देश असा होता की गरीब- श्रीमंत, काळा- गोरा, जातीपाती, सबल -दुर्बल, असे सगळे भेदभाव मिटवून सर्वांना एक सारखा सामाजिक न्याय मिळावा, आणि एक प्रकारे शांती आणि सुरक्षा याची सुखद जाणीव सर्व मानव जातीला होत राहावी. असा ठराव त्यावेळी करण्यात आला होता.

हे वाक्यं वाचताना कधी छान वाटतात नाही? पण इतर अनेक जसे छान छान डे असतात, नुकताच व्हॅलेंटाईन डे होऊन गेला, तसाच हा सुद्धा एक डे म्हणून त्याचा दिवस घालून आपण मोकळे होणार आहोत. संबंधित न्यायव्यवस्था कागदी घोडे नाचवण्यासाठी आज काहीतरी फुटकळ कार्यक्रम घेतील आणि झाला एकदाचा सामाजिक न्याय डे साजरा करतील आणि मागचा एखादा कॉपी-पेस्ट अहवाल मस्त आणी सुस्त वरिष्ठांना पाठवून देतील..

अंमलबजावणी शून्य असलेलं हे कागदी प्रशासन किती भीषण भयानक विध्वंसाकडे घेऊन जात आहे, हे आज आपण उघड्या डोळ्यांनी पाहत आहोत. जातीपातींसाठी गोरगरिबांसाठी ज्येष्ठांसाठी महिलांसाठी छान छान कायदे, सोयीस्कर सुधारणा अमेंडमेंट याचा महापुर येतो आहे आणि प्रत्यक्ष अंमलबजावणी शून्य.. उलट परिणाम उलटाच होताना दिसतोयं.

तारीख पे तारीख.. कोर्टामध्ये झाडाखाली बसून पिढ्यान्‌पिढ्या संपताना दिसत आहेत.. आणि मंत्र्यांसाठी सेलिब्रिटींसाठी मात्र रात्री १२ वाजता कोर्ट चालू राहतं.. देशामध्ये आज साडेतीन कोटी केसेस अशा आहेत की, त्या केसेस पंधरा वर्षापेक्षाही जास्त कालावधीपासून तारीख पे तारीख चालूच आहेत आणि त्या केसच्या निकालावर लाखो नव्हे करोडो लोकांच्या जीवनमरणाचा प्रश्न अवलंबून आहे. बिचारे बसले आहेत डोळे लावून, आज नाहीतर उद्या न्याय मिळेल म्हणून.. 'जस्टीस डिलेड इज जस्टीस डिनाईड' म्हणजे न्याय द्यायला थोडा जरी विलंब झाला तर तो एक मोठा अन्याय ठरेल, असे संविधानकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते. त्या महामानवाने ज्या ज्या तरतुदी केल्या, त्या सगळ्या गोष्टींना आज तिलांजली दिली गेलेली दिसते, ज्वलंत उदाहरण सांगायचं म्हणजे आरक्षण..

संपूर्ण जगाविषयी बोलण्याचा तर आपल्याला अधिकार नाही, कारण जगातील सर्वात मोठी लोकशाही असा चेहरा असलेले आपण आपलेच दात आणि आपलेच ओठ, अशी आपली अवस्था आहे. आपल्या देशाची सामाजिक न्यायाची आजची परिस्थिती पाहिली तर 'अंधा कानून' चित्रपटाचीच आठवण होते.. पैसे असतील तर चांगला वकील मिळेल, चांगला वकील मिळाला तर 'तारीख पे तारीख' मिळेल आणि त्यानंतर एक महानाट्य सुरू होईल.

रात्रीतून विकले जाणारे न्यायाधीश, राज्यकर्त्यांचे मंगळसूत्र गळ्यात घातलेली पोलिस तपास यंत्रणा, जातीचा वापर कोणाला तरी जात्यात घालून दळण्यासाठी करणारे समाजकंटक, हे दृश्य इतकं सामान्य झालं आहे की, याच्यामध्ये आश्चर्य आणि असामान्य असं काही वाटेनासं झालं आहे.

चीन देशाचं संविधान जगात सर्वात छोटं अवघं २५-३० पानांचं आहे, आणि आपलं संविधान जगात सर्वात मोठं आहे. तरीपण चीनमध्ये छोट्यात छोटा गुन्हेगार तर सुटत नाहीच, पण मोठ्यात मोठा गुन्हेगार तर लगेच संपतोच.. याउलट आपल्याकडे एवढं मोठ्ठ प्रचंड कायद्याच्या तरतुदींचे उलट सुलट प्रक्रियांचे, वाटा आणि पळवाटांचं संविधान असूनही शिक्षा या शब्दांमध्ये तंतोतंत बसेल असा कुणीच गुन्हेगार नाही.. तरीदेखील ज्यांच्याकडे पैसा सत्ता जात आणि झुंड यापैकी काही नाही, असे असंख्य कैदी फक्त आरोप निश्चित व्हायच्या प्रतिक्षेत वर्षानुवर्ष तुरुंगात खितपत पडलेले आहेत, आणि संपूर्ण देशात तुरुंग अपुरे पडायला लागलेले आहेत. त्यामुळे 'सद्रक्षणाय खलनिग्रहणाय', 'सत्यमेव जयते', न्यायदेवतेचा न्याय सर्वांसाठी समान, असे हे सगळे विनोदी वाक्य काढून टाकून न्यायालयांमध्ये घोषवाक्य जर वापरायचं झालं तर 'जिसकी लाठी उसकी भैंस'.. असं घोषवाक्य लिहायला हरकत नाही.

याला आपणच सर्व जबाबदार आहोत, असेही म्हणता येणार नाही. कारण ज्यांच्याकडे न्याय मागायचा ती संपूर्ण यंत्रणात जर खालपासून वरपर्यंत भ्रष्ट असेल तर काय करायचं? जिथे ज्यांना आपण आधारस्तंभ म्हणतो, ते संसद, प्रशासन, न्यायव्यवस्था आणि पत्रकारच जर विकलेले असतील तर त्या देशाचे भवितव्य सांगण्यासाठी कुठल्याही ज्योतिषाची आवश्यकता नाही. अशा भीषण यक्षप्रश्नांची निर्मिती इतिहासात अनेक वेळा घडुन गेली, म्हणूनच रक्तरंजित क्रांती झाल्या.. आपणही त्याच वाटेवर आहोत. ज्यांचे वय आज ४० ते ५० च्या पुढे आहे, त्यांचं सगळं जीवन जवळजवळ पूर्ण झालंय, परंतु जे आता बाल अवस्थेत आणि ऐन तारुण्यात आहेत, त्यांचं भवितव्य भयान अंधारात आहे, कारण अजून पाच दहा वर्षात सामाजिक न्याय हा विषयच हद्दपार झालेला दिसेल, कारण 'ज्याच्या अंगात सगळ्यात जास्त माज, त्याचाच समाज' असे चित्र हळूहळू निर्माण व्हायला लागले आहे.

ज्याच्याकडे प्रचंड पैसा किंवा सत्ता किंवा मसल पावर किंवा झुंड आहे, तोच जगू शकेल, ज्याच्याकडे प्रचंड पैसा आहे किंवा सत्ता आहे किंवा मसल पावर आहे किंवा झुंड आहे, 'सर्वायव्हल ऑफ द फिटेस्ट' या उत्क्रांतीच्या नियमामध्ये फक्त तोच बसू शकेल.. त्यामुळे जगायला तोच पात्र ठरेल.. या सगळ्या गोष्टी कशातून मिळतात? तर सत्तेतून मिळतात, सत्तेतून पैसा, पैशातून मसल पावर आणि लाभार्थी झुंड... आणि त्यातून पुन्हा सत्ता.. दोन-पाच हजार रुपये घेऊन आपण आपलं विकलेलं मत हे आपणच सुरू केलेलं दुष्टचक्र भस्मासुरासारखं आपल्यालाच नष्ट करणार आहे.

सामाजिक न्याय दिवसांच्या पार्श्वभूमीवर सर्वांनी याचा चिंतन करायला हवं, कारण मी सुरक्षित आहे, या गैरसमजात आपण झोपा काढत असताना एक दिवस अचानक आपणच मोठे केलेल्या जातीपातीच्या सत्तेच्या भस्मासुरांकडून जाळण्यासाठी आपल्याही घराची डोअर बेल वाजणार आहे.

हे लक्षात घेऊन आगामी संकटाला सामोरे जायची, आणि आपल्या पुढच्या पिढीला त्याची जाणीव करून देऊन सामाजिक, शारीरिक, मानसिक तयारी करणे गरजेचे आहे. नाहीतर एखादा दिवस घातल्यासारखा हा 'सामाजिक न्याय दिवस' नुसता सरकारी समारंभात घालून उपयोग नाही.

**- सुहासभाई मुळे, अध्यक्ष, जनहित परिषद जागरूक नागरिक मंच, अहिल्यानगर**



छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित अभिवादन करताना मनसे उपशहराध्यक्ष दिपक दांगट. समवेत धीरज लालवानी, गौरव चाफे, संतोष पाटोळे, समीर शेख, संतोष गोयल आदि.

# 'दासबोधातील उपदेश' निबंध स्पर्धेत कु. हर्षा अत्रेला प्रथम क्रमांचे बक्षिस



नगर - श्री समर्थ विद्या प्रसारक मंडळातर्फे विद्यार्थ्यांमध्ये ज्ञान व संस्कारांचा समन्वय साधला जावा या हेतूने 'श्री रामदास नवमी' निमित्त दरवर्षी विविध स्पर्धा घेण्यात येतात.

यातील निबंध स्पर्धेमध्ये 'दासबोधातील उपदेश' या विषयावरील निबंधात कु. हर्षा राहुल अत्रे हिला प्रथम क्रमांकाचे बक्षीस मिळाले आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

